रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १४९
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १५ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## पुन्हा चक्रीवादळ धडकणार; काही ठिकाणी पावसाचा अंदाज



**नवी दिल्ली :** एकीकडे देशातील अनेक भागांमध्ये हाड गोठवणारी थंडी पडली आहे, तर दुसरीकडे पुन्हा एकदा हवामान विभागाकडून चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील एक आठवडा देशभरातील अनेक भागांमध्ये थंडीची लाट कायम राहणार आहे, काही भागांमध्ये दाट धुकं पडणार असून, काही भागांमध्ये अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. एकीकडे थंडीचे संकट असतानाच आता हवामान विभागाकडून अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मन्नारच्या खाडी परिसरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून, अनुकूल वातावरणामुळे तो पुढील २४ तासांमध्ये पश्चिमेकडे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील २४ तासांत दक्षिण अंदमानच्या समुद्रात चक्रीवादळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

अंतरंग
खोपोली शीळफाटा मार्गावर अपघातांची मालिका/२
कळंबोलीत अमली पदार्थांचे रॅकेट उद्ध्वस्त/३
लोकलमध्ये तांत्रिक बिघाड; खोपोलीकरांची तारांबळ/५

# सीकेटी महाविद्यालयास नॅकचे ए++ मानांकन प्रदान; शिरपेचात मानाचा तुरा

## महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांमध्ये 'सीकेटी'ला दुसरे स्थान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या चौथ्या मूल्यांकनाच्या फेरीसाठी नॅक पीअर टीमने २ आणि ३ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली होती. या मुल्यमापानामध्ये राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषदने (नॅक) महाविद्यालयास ३.५२ सी.जी.पी.ए. सह 'ए++' हे सर्वोच्च मानांकन शुक्रवारी (दि.१३) प्रदान केले आहे. या अभुतपूर्व यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यासोबतच महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयांपैकी सीकेटी महाविद्यालय क्रमांक दोनचे महाविद्यालय बनले आहे.

अवघ्या अडीज दशकांहून काही अधिक कालावधीत महाविद्यालयाने पहिल्या दोन फेरीत अ श्रेणी, तिसऱ्या फेरीत अ+ श्रेणी आणि चौथ्या फेरीत अ++ श्रेणी प्राप्त करत शैक्षणिक क्षेत्रातील आपले धुरिणत्व पुन्हा एकदा सिद्ध केले.

या देदीप्यमान यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर , संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी.गडदे यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व तसेच विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांचे कौतुक केले आहे.

राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषद (नॅक) ही देशभरातील उच्च शिक्षण प्रदान करणाऱ्या शैक्षणिक संस्थानांचे शास्त्रीय पद्धतीने शैक्षणिक परीपेक्ष्य, अध्ययन-अध्यापन प्रणाली, विस्तारकार्य, संशोधन, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन आदी निकषांच्या आधारे मुल्यांकन करून त्यांना श्रेणी प्रदान करते. याच धर्तीवर सीकेटी कॉलेजच्या चौथ्या मूल्यांकनाच्या फेरीसाठी नॅक पीअर टीमने भेट दिली होती. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्यापासून नॅक मुल्यांकनाचा विषय प्राधान्यक्रमाने हाती घेतला होता. या मूल्यांकनाच्या प्रक्रियेमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. डी. आघाव यासोबतच कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचे प्रमुख, सर्व विभाग आणि समित्यांचे प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली.

या शैक्षणिक मूल्यमापन भेटी दरम्यान नॅक पिअर टीमचे चेअरमन कलिंगा विद्यापीठ, रायपुर, छत्तीसगड कुलगुरू डॉ. आर. श्रीधर, समन्वयक सदस्य म्हणून सरदार पटेल विद्यापीठ, गुजरातच्या जैविक विज्ञान (बायोसायन्स) विभागाचे प्रमुख प्रोफेसर डॉ. कमलेशकुमार पटेल व सदस्य म्हणून **(पान २वर..)**

# महिलाशक्तीला अधिक सशक्त करणार -पंतप्रधान

## संविधानावरून काँग्रेससह गांधी घराण्यावर सडकून टीका



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदीय हिवाळी अधिवेशनात शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधानाच्या मुद्द्यावरून विरोधकांवर सडकून टिका केली. यामध्ये त्यांनी संविधानात महिलांना असलेल्या सन्मानाबद्दल भाष्य करताना आपल्या देशातील महिलाशक्तीला अधिक सशक्त करणार असल्याचे सांगितले.

विरोधकांनी हिवाळी अधिवेशनात संविधानावरून भाजप सरकारला घेरले. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधकांना उत्तर देण्यासाठी लोकसभेत आल्यावर त्यांनी काँग्रेस आणि गांधी घराण्यावर टीका केली. ते म्हणाले की, आपल्या भाषणात बोलताना नरेंद्र मोदी हे म्हणाले की, सर्व शंका दूर करत संविधान आपल्याला इथंपर्यंत घेऊन आले. भारताला लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते. महान देशासाठी लोकशाहीची व्यवस्था नवी नाही. आज सर्वच क्षेत्रात महिला या आघाडीवर असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आभार मानतानाही मोदी दिसले.

पुढे नरेंद्र मोदी म्हणाले की, महिलांबाबतचे कायदे आम्ही आणले. काहीजण विविधतेत विरोधाभास शोधत आहेत. अनेकांकडून विविधतेत विष पेरण्याचे काम सुरू आहे. महिलांची संविधान निर्मितीमध्ये मोठे योगदान असल्याचे त्यांनी म्हटले. देशाच्या एकतेत ३७० कलम अडसर होते. आयुष्मान कार्डचा गोरगरीबांना मोठा फायदा झाला.

संविधानाच्या शक्तीवर चर्चा झाली असती तर आनंद झाला असता असेही म्हणताना पंतप्रधान मोदी दिसले. काँग्रेसची पाप कधीही धुतली जाणार नाहीत. काँग्रेसच्या एका कुटुंबाने संविधानाला धक्का दिला. नेहरूंची परंपरा इंदिरा गांधींना सुरूच ठेवली, असेही त्यांनी सांगितले.

### 'काँग्रेसने लोकशाहीचा गळा घोटला'

आमच्या संविधानात एकात्मता आणि एकता आहे. भारताला विकसित करण्याचा संकल्प आहे. संविधान निर्मात्यांनी आम्हाला दिशा दाखवली. देशातील एकता ही आमची प्राथमिकता असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले. संविधानाला २५ वर्षे झाली तेव्हा लोकशाही संपवण्याचे काम करण्यात आले. काँग्रेसने लोकशाहीचा गळा घोटला होता, आणीबाणीच्या काळात लोकशाही संपवण्याचे काम झाले, असेही पंतप्रधान मोदींनी म्हटले.

# नवी मुंबईतून १६ नायजेरियन नागरिक ताब्यात; १२ कोटींचे ड्रग्ज जप्त

**पनवेल : वार्ताहर**

थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसराससह नवी मुंबईत २५ ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवायांमध्ये १२ कोटींचे ड्रग्ज पोलिसांच्या हाती लागले आहे. याप्रकरणी १६ नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबईत ड्रग्ज विक्रेत्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. गतवर्षी खारघर येथे नायजेरियन व्यक्तींच्या अड्ड्यावर छापा टाकून थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांमध्ये पुरवले जाणारे ड्रग्ज जप्त केले होते. त्यानुसार यंदाही थर्टी फर्स्टच्या अगोदरच पोलिसांनी ड्रग्ज विक्रेत्या टोळ्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची मोहीम राबवली. पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकामार्फत ड्रग्ज विक्रीत सक्रिय असलेल्या नायजेरियन टोळ्यांची माहिती मिळवली होती. त्याद्वारे गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांच्या पथकांनी एकाच वेळी परिमंडळ एक व दोनमधील विविध ठिकाणी छापे टाकले. तळोजा, खारघर, वाशी, कोपर खैरणे, नेरूळ, परिसरात वास्तव्याला असलेल्या नायजेरियन व्यक्तींची झाडाझडती घेण्यात आली. त्यात आठ नायजेरियन व्यक्तींकडे एकूण १२ कोटींचे विविध प्रकारचे ड्रग्स मिळून आले, तर आठ नायजेरियन व्यक्ती बनावट कागदपत्रांद्वारे भारतात वास्तव्य करत असल्याचे समोर आले.

या एकूणच कारवाईत १६ नायजेरियन नागरिकांना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. नायजेरियन व्यक्तींकडून शहरात छुपा आश्रय मिळवून ड्रग्ज विक्रीचे रॅकेट चालवले जात असल्याचे या कारवाईतून समोर आले आहे. तसेच या कारवाई दरम्यान पासपोर्ट व व्हिसा संपलेल्या ७३ ऑफ्रिकन नागरिकांना देश सोडून जाणेबाबतच्या नोटीसा अदा करण्यात आल्या आहेत.

### थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर २५ ठिकाणी पोलिसांची छापेमारी



## निवडक

### 'आधार' अपडेटसाठी मुदत पुन्हा वाढवली

**नवी दिल्ली :** भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने आधार डेटाबेसमधील कागदपत्रं अपडेट करण्याची मुदत पुन्हा एकदा वाढवली आहे. यूआयडीएआयने आता पुढील वर्षी १४ जूनपर्यंत विनामूल्य आधार अपडेट करता येणार असल्याचे म्हटले आहे. या मोफत सुविधेअंतर्गत कार्डधारकांना आता १४ जून २०२५ पर्यंत त्यांच्या आधार डेटाबेसमध्ये आपले आधार कार्ड मोफत अपडेट करता येणार आहे.

### गाबा कसोटी सामन्यात पहिल्याच दिवशी पाऊस

**ब्रिस्बेन :** भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील गाबा कसोटी सामन्यातील पहिल्या दिवसाच्या खेळावर पावसाने पाणी फेरले. रोहित शर्माने नाणेफेक जिंकून ढगाळ वातावरणात पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण पहिल्या दिवशी केवळ १३.२ षटकांचा खेळ झाला. ऑस्ट्रेलियन सलामीवीर नॅथन मॅकस्विनी आणि उस्मान ख्वाजा यांनी नव्या चेंडूवर संयमी खेळी केल्याचे पाहायला मिळाले.

# नववर्षापूर्वी शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट

## विनाहमी मिळणार दोन लाखांपर्यंतचे कर्ज



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिझर्व्ह बँकेने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. शेतीचा वाढता खर्च लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने शेतकऱ्यांना विनाहमी देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. यापूर्वी ही मर्यादा १.६ लाख रुपये होती. ही नवी मर्यादा १ जानेवारी २०२५ पासून लागू होईल, असे कृषी मंत्रालयाने शनिवारी (दि.१४) जारी केलेल्या निवेदनात म्हटलेय. कोट्यवधी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येतेय.

आरबीआयने २०१०मध्ये कृषी क्षेत्राला विनाहमी कर्ज देण्यास सुरुवात केली. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने एक लाख रुपये विनागॅरंटी देण्याची घोषणा केली. २०१९ मध्ये ही मर्यादा वाढवून १.६ लाख रुपये करण्यात आली होती. आता त्यात एकदा वाढ करण्यात आली आहे.

कृषी क्षेत्रातील वाढत्या महागाईमुळे लघु व मध्यम शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या शेतीवर परिणाम होत होता. रिझर्व्ह बँकेने वाढवलेली मर्यादेचा या शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शेतकऱ्यांकडे साधनसामुग्री अत्यंत मर्यादित होती. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना या विनाहमी कर्जाचा फायदा होणार आहे.

### सरकारकडून थेट रक्कम

केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना वर्षभरात दोन ते दोन हजार रुपयांचे तीन हप्ते मिळतात. तर काही राज्य सरकारही या रकमेत काही रक्कम जोडून शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे पैसे देतात. याशिवाय शेतकऱ्यांना अनुदानाच्या माध्यमातून स्वस्त खतेही उपलब्ध करून दिली जात आहेत.

## नागपुरात शपथविधी सोहळ्याची लगबग

**नागपूर :** येथील राजभवनात फडणवीस सरकारच्या नव्या मंत्रीमंडळाचा शपथविधी सोहळा होणार आहे. १५ डिसेंबरला दुपारी ४च्या सुमारास शपथविधी सोहळा होणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. १९९१नंतर पहिल्यांदाच नागपुरात मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. १९९१मध्ये तत्कालीन राज्यपाल सी सुब्रमण्यम यांनी छगन भुजबळ आणि इतर आमदारांना मंत्रिपदाची शपथ दिली होती.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरच्या राजभवनातील हिरवळीवर नव्या मंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. त्यामुळे जय्यत तयारीला सुरुवात झाली आहे. एकीकडे राजभवनात तयारीला वेग आला आहे. तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या स्वागतासाठीही नागपूरकर सज्ज झाले आहेत. या सोहळ्याकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहिलेले आहे.

# खारघरमधील इस्कॉन मंदिराचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे इस्कॉनच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या भव्य अशा श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचे उद्घाटन अध्यात्मिक वातावरणामध्ये होणार आहे. हा सोहळा ९ ते १५ जानेवारी २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. समाजाच्या अध्यात्मिक प्रवासामध्ये मैलाचा दगड ठरावा अशा स्वरूपाचे हे मंदिर झालेले असून त्याच्या उद्घाटनासाठी देशाचे पंतप्रधान सन्माननीय नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधानांच्या शुभहस्ते कल्चरल सेंटर आणि भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे अवशेष सांभाळणाऱ्या वेदिक म्युझियम चे भूमिपूजन देखील होणार असल्याची माहिती मंदिराचे अध्यक्ष एच. जी. सूरदास यांनी आज खारघर येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या उद्घाटन सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समावेत महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच अन्य मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. इस्कॉनचे संस्थापक आचार्य महाप्रभू भक्ती वेदांत स्वामी प्रभुपाद यांच्या माध्यमातून जगभरात इस्कॉन मंदिरांचे जाळे पसरले आहे. इस्कॉनच्या माध्यमातून अत्यंत पवित्र अशा गुरुपरंपरा, वैश्विक बंधुता तसेच शांती प्रेम आणि सद्भावनेचा संदेश दिला जातो. खारघर येथे उभारण्यात येणारे श्री श्री राधा मदन मोहनजी मंदिर हे महाराष्ट्रासाठी एक गौरव ठरेल. या ठिकाणी पारंपारिक वेदिक अभ्यासक्रम शिकविण्यासाठी महाविद्यालय, भक्तीवेदांत वाचनालय, आयुर्वेदिक उपचार पद्धती युक्त वैद्यकीय सेवालय, गोशाळा, ज्येष्ठ नागरिकांसाठी आश्रम, वेदिक वस्तुसंग्रहालय, ऑरगॅनिक शेती, कल्चरल सेंटर अशा अनेक सुविधा असणार आहेत. **(पान २वर..)**

# नववर्षाच्या स्वागतासाठी रिसॉर्ट, फार्महाऊसला पसंती



**पनवेल : वार्ताहर**

नववर्षाच्या स्वागतासाठी तयारी सुरू झाली असून पनवेल परिसरातील अनेक रिसॉर्ट, हॉटेल्स आणि ग्रामीण भागातील फार्महाऊसच्या बुकिंग सुरू आहेत. यासाठी मुंबईसह अनेक शहरातील पर्यटक बुकिंग करत आहेत. यावर्षी ३१ डिसेंबर मंगळवारी आहे. त्यामुळे शनिवार व रविवार हे दोन सुट्टीचे वार धरून किमान चार दिवसांच्या सुट्टीचे नियोजन करता येणार आहे.

पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात फार्म हाऊस उभारण्यात आले आहेत. तसेच अत्याधुनिक पद्धतीचे व ग्राहकांना आवश्यक असणारे साधनसामुग्रीसह रिसॉर्ट सज्ज आहेत. तसेच येथील विविध पद्धतीने नटलेल्या हॉटेल्समध्ये राहण्याची व्यवस्था व्हावी याकरिता हॉटेलची बुकिंग सुरू करण्यात आली आहेत. पनवेल परिसरात गेल्या काही वर्षांत उत्तम व्यवस्था असणारे हॉटेल तयार झाले आहेत. यात वातानुकूलित खोल्या, पोहण्यासाठी तलाव आधीसह स्थानिक पदार्थ आणि मासळीच्या पदार्थांची रेलचेल असणार आहे.

यातील अनेक हॉटेलची बुकिंग ही मुंबईतून केली जात आहे. हॉटेल्स मध्ये वातानुकूलित खोलीसाठी पाच हजार तर काही ठिकाणी विनावातानुकूलित खोलीसाठी तीन हजार रुपये आकारले जात आहेत. त्यामुळे यंदा नववर्षाचे स्वागत पनवेल परिसरात जल्लोषात होण्याची चिन्हे आहेत.

नववर्षाच्या स्वागतासाठी पनवेल परिसरातील व ग्रामीण आणि निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या फार्म हाऊसना ही पसंती दिली जात आहे. त्यामध्ये पनवेल परिसरात असलेले कर्नाळा अभयारण्य, उसर्ली बुद्रुक, नेरे परिसर, चिंचवण, शिरढोण, मालडुंगे आदींसह धरण परिसरात असलेल्या फार्म हाऊसची बुकिंग दोन महिन्यांपूर्वीच झालेली आहे. यात कुटुंब तसेच ग्रुपसाठी ही व्यवस्था करण्यात येत आहे. यासाठी पाच ते दहा हजार रुपये आकारण्यात येत असल्याची माहिती राज रिसॉर्टचे मालक संतोष उरणकर यांनी दिली आहे.





**पनवेल : मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दत्त जयंती मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेपर्यंत गव्हाण शिवाजीनगर येथील श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज आध्यात्मिक ज्ञानमंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या हरिनाम सप्ताहाला शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), कल्पना ठाकूर, रत्नप्रभा घरत, रमण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर आदी उपस्थित होते.**

# धान्य वितरणात 'सर्व्हर डाऊन'

## ई पॉस मशीन चालेना; ऑफलाईन वितरणाची मागणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रेशन वितरणात पुन्हा एकदा सर्व्हरचा अडसर निर्माण झाला आहे. धान्य वितरणात येणारी अडचण लक्षात घेवून आता पुन्हा ऑफ लाइन धान्य वितरणाला राज्य सरकारने परवानगी द्यावी, अशी मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे. धान्य वितरणात खोडा येत असल्याने लाभार्थी मात्र वैतागले आहेत.

सर्व्हर डाऊन असल्याने ई पॉस मशीन अतिशय संथ गतीने चालत आहेत. कधी कधी पूर्णपणे ठप्प होत आहेत. त्यामुळे ग्राहकांना ताटकळत थांबावे लागत आहे. अनेकदा थांबूनही पॉस मशीन पुन्हा सुरू होईल याची शाश्वती नसते. अशावेळी लाभार्थ्यांना धान्य वितरण कसे करायचे असा प्रश्न रास्त भाव धान्य दुकानदारांना पडला आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत ई-पॉस मशीनद्वारे लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करुन (बायोमेट्रिक ओळख पटवून) धान्य वितरण करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात देखील सर्व्हरमधील तांत्रिक बिघाडामुळे धान्य वितरणात अडथळे आले होते. त्यावेळी ऑफ लाईन धान्य वितरणास शासनाने परवानगी दिली होती, परंतु या वेळी अद्याप शासनाचे तसे आदेश जिल्हा पुरवठा विभागाला प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांची गैरसोय होत आहे.

> **ई पॉस मशीन वारंवार बंद पडत आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना धान्य वितरण करताना दुकानदाराना अडचणी येत आहेत. ही बाब लक्षात घेवून सरकारने ऑफ लाईन धान्य वितरण करण्यास परवानगी द्यावी. आणि लाभार्थ्यांची गैरसोय टाळावी.**
>
> **-प्रमोद घोसाळकर,** जिल्हाध्यक्ष, रास्तभाव धान्य दुकानदार संघटना

> **सर्व्हर डाऊन ची समस्या राज्यभर आहे. त्यामुळे रास्तभाव दुकानात धान्य वितरण अडचणीचे झाले आहे. मात्र शासनाने अद्याप ऑफ लाईन धान्य वितरण करण्यास परवानगी दिलेली नाही. शासनाच्या सूचना येताच तालुका पातळीवर तशा सूचना दिल्या जातील.**
>
> **-सर्जेराव सोनावणे,** जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड

# खोपोली -शीळफाटा अंतरात अपघातांची मालिका सुरूच

**खोपोली: प्रतिनिधी**

मुंबई -पुणे महामार्गावरील खोपोली शहर ते शीळफाटा अंतरात दररोज भयानक अपघात घडत आहेत. यातील मोठ्या संख्येने दुचाकीचे अपघात घडत असून यात मोठ्या संख्येने तरुणाई क्षतिग्रस्त होत आहेत .मागील दोन महिन्यांत दररोज सरासरी एक अपघात घडत असून यातील अनेक अपघातात दुचाकी स्वार गंभीर जखमी झाले आहेत अतिवेग, धूम स्टाईलने व वाहतूक नियमांचे उल्लंघनामुळे मोठ्या संख्येने अपघात घडत आहेत

खोपोली वाहतूक विभाग व पोलिसांनी याची गंभीर दखल घेऊन , तरुणाईत जागृती आणण्यासाठी पुढाकार घेण्याचा निश्चय केला आहे. याकामी खोपोली अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय सामाजिक संस्थेचे सदस्यही पुढाकार घेणार आहेत .

गुरुवारी रात्रीही असाच भयानक अपघात महामार्गावर घडला .खोपोली शहरातून शीळ फाट्याच्या दिशेने मोटारसायकल वरून जाणाऱ्या पुर्वेश शिंदे - २५ रा. मोगलवाडी हा युवकाचे सय्यद गाझीबाबा दर्ग्या समोरील स्पीड ब्रेकर वर नियंत्रण सुटले व तो काही फूट अंतरावरील रेस्ट हाऊस शेजारील भिंतीच्या कडेला असलेल्या झाडाला धडकला आणि जखमी झाला. डाव्या बाजूच्या हातापायाला मल्टीपल फ्रॅक्चर आणि डोक्याला मोठी जखम झाल्याने त्याला `खोपोली नगरपालिका रुग्णालयात प्रथमोपचार करून एमजीएम हॉस्पीटल कामोठे येथे दाखल करण्यात आले आहे. या वेळी घटना स्थळी खोपोली पोलीस स्टेशनचे अधिकारी, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेचे सदस्य आणि स्थानीक युवकांनी मदतकार्य केले व मोठा अनर्थ टळला.अती वेग, नियमांचे पालन न करणे, हेल्मेट न वापरणे इत्यादी बाबी अशा भीषण अपघातास कारणीभूत ठरत आहेत.




खोपोली पोलिस स्टेशनचे पो. नि. शितल राऊत यांनी व्हिडीओद्वारे सर्वांना जागृती साठी आवाहन केले होते.मागील दोन अडीच महिन्यात महामार्गावरील या अंतरात ३४ अपघाताच्या घटना घडल्या असून ,मोठ्या संख्येने अपघात दुचाकी संबंधित व तरुणांचे झाले आहेत. जास्तीतजास्त अपघात रात्री नऊ ते एक वाजण्याच्या व पहाटेच्या सुमारास घडले असल्याचे समोर येत आहे.

दरम्यान, वाहतूकीच्या नियमांचे पालन करताना हल्लीची तरुणाई दुर्लक्ष करत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. अनेक वेळा वाहतूक नियमांबाबत जनजागृती तसेच दंडात्मक कारवाई करूनही अपघात घड्त असल्याचे पहायला मिळते. दिवसेंदिवस अपघाताच्या घटना वाढताना दिसत आहेत. त्यामुळे अशा अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी नागरिकांनीच वाहतूकीचे नियम पाळावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून होत असते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आंतरविद्यालयीन विविध स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे बुधवारी (दि.१८) सकाळी १० वाजता वाणिज्य व विज्ञान शाखेत इयत्ता अकरावी व बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले आहे.

या स्पर्धा घेण्याचा प्रमुख उद्देश अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना लेखन कौशल्य, सादरीकरण कौशल्ये, व्यावसायिक जाहिराती, फोटोग्राफी अशी वेगवेगळी कौशल्ये विकसित व्हावीत व त्यांना भविष्यात त्यांच्या करिअरसाठी फायदा व्हावा हा आहे. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने निबंध, ऍडमँड शो, रील मेकिंग व नेचर्स फोटोग्राफी अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धांसाठी नवी मुंबईतील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना आमंत्रित केले आहे तसेच या सर्व स्पर्धेसाठी रोख रकमेचे बक्षिसे तसेच सहभाग प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

या स्पर्धांसाठी वेगवेगळे विषय विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत त्या त्यामध्ये प्रामुख्याने एमर्जिंग ट्रेंड्स इन कॉमर्स, रोल ऑफ टेक्नॉलॉजी इन मॉडर्न अकाउंटिंग, इम्पॉर्टन्स ऑफ रिनिएबल एनर्जी रिसोर्सेस, रोल ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन शिपिंग द फ्युचर ऑफ एज्युकेशन, कॉस्मेटिक्स इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, इन्शुरन्स म्युच्युअल फंड्स, इक्विटी ऑरगॅनिक फूड, सेव वॉटर, सेव इलेक्ट्रिसिटी, सेव ट्रीज, जेंडर इक्वलिटी व झिरो हंगर वेगवेगळे विषय विद्यार्थ्यांना स्पर्धांसाठी देण्यात आले आहेत.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर व रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी नवी मुंबईतील सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना आवाहन केले आहे. या सर्व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत.

# दीपक फर्टिलायझर्सतर्फे शून्य सांडपाणी विसर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खते आणि रासायनिक उद्योगातील अग्रगण्य कंपनी असलेल्या दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएफपीसीएल) कंपनीने तळोजा येथे नव्याने सुरू झालेल्या अमोनिया उत्पादन प्रकल्पात प्रगत शून्य सांडपाणी विसर्ग (झिरो लिक्विड डिस्चार्ज-झेडएलडी) प्रणालीचा समावेश करून शाश्वत उत्पादन निर्मितीमध्ये आपली बांधिलकी अधिक मजबूत केली आहे.

एकात्मिक एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट (ईटीपी) आणि रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) प्रक्रिया परफॉर्मन्स केमिसर्व्ह लिमिटेड मधील ही अत्याधुनिक झेडएलडी प्रणाली पर्यावरणीय व्यवस्थापनात एक गुणवत्तेचा मापदंड स्थापित केला आहे. दर तासी २५ घनमीटर पाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेली झेडएलडी प्रणाली प्रक्रिया केलेल्या पाण्याचा संपूर्ण पुनर्वापर सुनिश्चित करते, ज्यामुळे प्रकल्पातून शून्य सांडपाणी विसर्ग हा उद्देश साध्य होतो.

झेडएलडी प्रणाली ईटीपी आणि आरओ प्रक्रियेच्या सहकार्याने औद्योगिक सांडपाण्यातून पाणी पुनर्प्राप्तकरण्यासाठी आणि पुनर्वापर करण्यासाठी कार्य करते. झेडएलडी तंत्रज्ञानातील सुरुवातीची भांडवली गुंतवणूक जास्त असली, तरी पाण्याचा वापर कमी करून दीर्घकालीन बचत करता येऊ शकते, असे अग्रवाल यांनी सांगितले.

# न्हावे विद्यालयात आंतरशालेय वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये आंतरशालेय क्रीडा महोत्सवास प्रारंभ झाला.

वार्षिक क्रीडा महोत्सव कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच व स्कूल कमिटी सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच राजेश म्हात्रे, स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य किसन पाटील, ग्राम सुधारक मंडळाचे अध्यक्ष गजानन म्हात्रे, मीनाक्षीताई पाटील,माजी सरपंच हनुमान भोईर, ग्रामपंचायत सदस्या रंजना पाटील, सुनिता भोईर, जागृती म्हात्रे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयतचे लाईफ मेंबर प्रमोद



कोळी यांनी विविध क्रीडा स्पर्धेचे सु व्यवस्थित नियोजन केले.

विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सर्व विद्यार्थ्यांनी विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन आपले नैपुण्य दाखववे, असे आवाहन स्कूल कमिटी सदस्य व माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी केले. ििवद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना व क्रीडा गुणांना वाव मिळत आहे. हे पाहून ग्रामस्थांमध्ये एक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्यामुळे विद्यालयाला सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही ग्राम सुधारक मंडळाचे अध्यक्ष गजानन म्हात्रे यांनी केले.

उत्कृष्ट नियोजनाबद्दल व विद्यार्थ्यांना भव्यदव्य क्रीडांगण उपलब्ध भविष्यात करून देऊ असे आव्हान किसन पाटील यांनी केले.ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धेचा आनंद घेतला. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी स्पर्धेची रूपरेषा सांगून शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

# महाविद्यालयीन प्रदर्शनी स्पर्धा उत्साहात

## एन.एन.पालीवाला कॉलेज ठरले प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील एसआयईएस ज्युनियर कॉलेजमध्ये सृष्टी-अनलॉकिंग द फ्युचर विथ एआय या प्रमुख कार्यक्रमाचा एक भाग म्हणून एआय इन एव्हरीडे लाइफ थीम असलेली भव्य आंतर-महाविद्यालयीन प्रदर्शनी स्पर्धा आयोजित केली होती.

इव्हेंट, ज्याने इयत्ता ९-१२मधील विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग पाहिला, मुंबई, ठाणे आणि रायगडमधील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे कौशल्य अनुभवण्यास मिळाले आर्टिफिशियल इंटेलिजन्स आपल्या दैनंदिन जीवनातील विविध पैलूंना हळूहळू कसे आकार



देत आहे आणि जगभरातील उद्योगांमध्ये क्रांती कशी घडवत आहे हे दाखविण्याचा या स्पर्धेचा उद्देश होता. एन.एन. पालीवाला कनिष्ठ महाविद्यालय, नवीन पनवेलने त्यांच्या नाविन्यपूर्ण एआय प्रकल्पासह प्रथम स्थान मिळवून विजय मिळवला.

रामनारायण रुईया कॉलेज माटुंगाने द्वितीय, तर न्यू होरायझन पब्लिक स्कूल, नवीन पनवेलने तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माटुंगा येथील एसआयईएस हायस्कूलच्या प्राचार्या कल्याणी अरुमुगम यांच्यासह पाहुण्यांच्या एका पॅनेलद्वारे करण्यात आले. डी.आर. एस.व्ही. विश्वनाथन, एसआयईएस येथील व्यवस्थापकीय परिषदेचे सदस्य आणि डॉ. कोएल रॉयचौधरी, एसआयईएस कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स (स्वायत्त), उपस्थितीमुळे कामकाजात प्रतिष्ठा आणि महत्त्व वाढले. या स्पर्धेत तरुणांच्या मनातील नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हे आरोग्यसेवा आणि शिक्षणापासून वाहतूक आणि मनोरंजनापर्यंत आधुनिक जीवनातील विविध पैलूंमध्ये कसे काम केले जाते याचे प्रात्यक्षिक दाखवले.

विद्यार्थ्यांसाठी त्यांची सर्जनशील कौशल्ये आणि तंत्रज्ञानाची समज प्रदर्शित करण्याची ही एक संधी होती. समीक्षकांच्या समितीमध्ये रश्मी पोटे आणि डॉ. राजेश्री शिनकर यांचा समावेश होता. दोन्ही समीक्षक सर्जनशीलतेची पातळी, तांत्रिक कौशल्य सादरीकरणाने प्रभावित झाले. जियोचे मार्केटिंग उपाध्यक्ष संदीप बालानी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा समारोप झाला.

# विकास घरत यांनी कामोठेमधील पाच क्षयरोगग्रस्तांना केली मदत

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा क्षयरोग विभागा मार्फत आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसीय टीबी मुक्त अभियान संपुर्ण रायगड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. या अभियानात सामाजिक दायित्वच्या भावनेतून माजी नगरसेवक विकास घरत यांनी क्षयरोग निदान झालेल्या कामोठेमधील ५ व्यक्तींना पोषणासाठी सहाय्य दिले.

या अभियानात अतिजोखमीच्या व्यक्तींची नॅट आणि एक्स रेच्या मदतीने क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. तसेच क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींवर त्वरित तसेच योग्य उपचार करण्यात येत असून क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींना पोषणासाठी निक्षय पोषण योजनेचा लाभ तसेच निक्षय मित्र बनवून पोषणासाठी सहाय्य देण्यात येत आहे. त्यापार्श्वभुमीवर या अभियानात सामाजिक दायित्वच्या भावनेतून माजी नगरसेवक विकास घरत यांनी क्षयरोग निदान झालेल्या कामोठेमधील पाच व्यक्तींना पोषणासाठी सहाय्य दिले. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. .



**पान १ वरुन**

# सीकेटी महाविद्यालयास नॅकचे ए++ मानांकन प्रदान; शिरपेचात मानाचा तुरा




यमुनानगर हरियाणा येथील गुरुनानक गर्ल्स कॉलेजच्या संचालिका डॉ. वरिंदर गांधी यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक विभाग, ग्रंथालय, मेकर स्पेस, परीक्षा विभाग, विद्यार्थी परिषद व कल्याण कक्ष, महिला विकास कक्ष, सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, भाषा प्रयोगशाळा, रेशीम संशोधन केंद्र, मशरूम रोपण केंद्र, विस्तार विभाग- राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय कॅडेट कोअर, जिमखाना, प्रशासकीय कार्यालय तथा महाविद्यालयातील पायाभूत सुविधांची पाहणी केली.

नॅक पीअर टीमने महाविद्यालयाचे शैक्षणिक परिपेक्ष्य (Criterion I- Curriculum -spects), अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन प्रणाली (Criterion II- Teaching, Learning and Evaluation), संशोधन, नवकल्पना आणि विस्तार (Criterion III- Research, Innovation and Extension), पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता आणि अध्ययन साधनसामग्री (Criterion IV- Infrastructure and Learning Resources), विद्यार्थी प्रगती आणि विविध उपक्रम (Criterion V- Student Support and Progression), व्यवस्थापन आणि संघटन (Criterion VI- Governance, Leadership and Management), संस्थानात्मक मूल्ये आणि सर्वोत्कृष्ट कार्यशैली (Criterion VII- Institutional Values and Best Practices) अश्या ०७ निकषांच्या आधारे मूल्यमापन केले यासोबतच विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, यांच्यासोबत संवाद साधला व आपला लेखी अहवाल नॅक पोर्टलवर जमा केला.

सर्व पाहणी संपन्न झाल्यानंतर समारोप बैठकीमध्ये नॅक पिअर टीमचे चेअरमन कलिंगा विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. आर. श्रीधर यांनी उपस्थितांना संबोधित करताना नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक सर्व घटकांची नियोजनबद्धपूर्ण तयारी केल्याबद्दल महाविद्यालयाच्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे तथा महाविद्यालयाच्या उत्कर्षामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावणारे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्याबाबत गौरवोद्गार काढले. तथा त्यांच्या कार्यकाळातील भेट दिलेल्या सर्व महाविद्यालयांपैकी सीकेटी महाविद्यालय क्रमांक १ चे महाविद्यालय असल्याचे प्रतिपादन केले.

# खारघरमधील इस्कॉन मंदिराचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार उद्घाटन


उद्घाटन सोहळ्यामध्ये अनेक उत्तमोत्तम धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. संपूर्ण आठवड्यात भक्तीपूर्ण वातावरणामध्ये भजन, किर्तन यांचे सादरीकरण होईल. सोहळ्यामध्ये वेदिक परंपरेनुसार आठ आचार्य आणि दहा प्रमुख दैवतांची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. अन्य अध्यात्मिक कार्यक्रमांच्यात वैष्णव समागम, नाटिका, भजन संध्या, किर्तन मेळा असे कार्यक्रम रंगतील. सोहळ्या दरम्यान रोज येणाऱ्या सगळ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन देखील केलेले आहे. नूतन मंदिराच्या उद्घाटना समवेत वेदिक म्युझियम आणि कल्चरल सेंटर यांचे भूमिपूजन होईल.

मंदिराचे अध्यक्ष एच जी सूरदास म्हणाले की, एखाद्या मरुद्यानप्रमाणे नवी मुंबईच्या निसर्गरम्य वातावरणात हे मंदिर खुलून दिसेल. अध्यात्म आणि भक्ती यांची अनुभूती घेण्यासाठी सगळ्यांसाठी हे मंदिर खुले असून सुदृढ समाज निर्मितीच्या दृष्टीने समाजाची सेवा करण्यासाठी हे भक्तिमय ठिकाण निर्माण करण्यात आले आहे. अध्यात्मिक वातावरणामध्ये शांती, विश्वास आणि आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी या मंदिरात कुणीही येऊ शकत. जात पात धर्म पंथ न पाळता सगळ्यांसाठी या मंदिरातील अध्यात्मिक कार्यक्रम आणि सेवा खुले असतील. उद्घाटन सोहळ्याच्या अधिक माहितीसाठी उपासना बागला यांच्याशी ७५०६५१३०३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण - उलवे येथील मेरिट-टेक आणि स्वरा कॉम्प्युटर्स च्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत कला आणि वाणिज्य ज्युनियर कॉलेज मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे धडे देतच बोर्डाची प्रश्नपत्रिका कशी सोडवावी या विषयाचे विशेष मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.



विश्वास मते - (एम. आय. - एम. के. सी. एल.) यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे देतच प्रश्नपत्रिका कशी सोडवावी याविषयीचे विशेष मार्गदर्शन प्रोजेक्टच्या सहाय्याने केले. तसेच मेरिट-टेक कॉम्प्युटर इन्स्टिटयूटच्या केंद्र मालक/शिक्षक प्रशिक्षक शाहीन काझी आणि केंद्र समन्वयक हारून काझी आणि स्वरा कॉम्प्युटर्सच्या केंद्र मालक/शिक्षक प्रशिक्षक सुमती म्हात्रे यांनी हे मार्गदर्शन वर्ग आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रारंभी विद्यालयाच्या वतीने प्राचार्य गोवर्धन घोडके व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर जनरल बडे सदस्य रवींद्र भोईर यांनी मान्यवरांचे स्वागत केले यावेळी जेष्ठ शिक्षक सागर रंधवे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर रंधवे यांनी केले तर आभार विशांत ठाकूर यांनी मानले. समारोप समारंभाला विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर व कलाशिक्षक गणेश भोईर उपस्थित होते

## निवडक

### टोल नाक्यावरील स्वच्छतागृह बंद

**पनवेल :** सार्वजनिक बांधकाम विभाग तर्फे खारघर टोल नाक्यावर उभारण्यात आलेले स्वच्छतागृह बंद



असल्यामुळे प्रवाशी वर्गात नाराजी पसरली आहे. स्वच्छतागृह बंद असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. सायन-पनवेल महामार्गावरील खारघर टोल नाक्यावर स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. या स्वच्छतागृहाची दुरवस्था झाल्यामुळे सहा महिन्यापूर्वी स्वच्छतागृहाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आल्यामुळे स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आले होते. पुणे येथून येताना खालापूर नंतर खारघर येथे टोलनाका असल्यामुळे बहुतांशी प्रवाशी लघुशंकेसाठी टोलनाक्यावर थांबतात, मात्र नुतनीकरणाचे काम पूर्ण होवून जवळपास तीन महिने झाल्यानंतरही स्वच्छतागृह बंद असल्यामुळे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### सोन्याच्या बांगडीची चोरी

**पनवेल :** एसटी प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाच्या हातातील ५५ हजार रुपये किंमतीची सोन्याची २७ ग्रॅम वजनाची बांगडी अज्ञात चोरट्याने लबाडीच्या इराद्याने चोरुन नेल्याची घटना पनवेल एसटी आगारात घडली आहे. शुभांगी पाटील (वय ६९) या त्यांच्या पतीसोबत गावी जाण्याकरिता पनवेल एस.टी.डेपोमध्ये पनवेल ते अलिबाग जाणार्या बसमध्ये चढत असताना कुणीतरी अज्ञात इसमाने गर्दीचा फायदा घेवून त्यांच्या हातामधील २७ ग्रॅम वजनाची सोन्याची बांगडी ही त्यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कैद्याचा हृदयविकारामुळे मृत्यू

**पनवेल :** तळोजा कारागृहातील अर्जुन केरू अभंग (वय ५०) या कैद्याचा मृत्यू झाला. अर्जुन अभंग या कैद्याच्या छातीत दुखत असल्याने त्याला वाशीमधील नवी मुंबई महापालिका सार्वजनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. अर्जुन अभंग याचा हृदय विकारामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. तळोजा कारागृहातील आरोपी अर्जुन अभंग याच्या छातीत दुखण्यास सुरुवात झाली होती. याबाबतची माहिती मिळताच तळोजा जेल येथील ॲम्ब्युलन्सने वाशी येथील महापालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरानी अर्जुन केरु अभंग याला तपासून उपचारापुर्वीच मृत घेषित केले. अर्जुन अभंग याला हृदयविकाराचा झटका आला असावा, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. वाशी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

# कळंबोलीत अमली पदार्थांचे रॅकेट उद्ध्वस्त

## पोलिसांनी केला ६.९० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

अंमली पदार्थ विरोधी पथकाने कळंबोली परिसरात सुरू असलेले अंमली पदार्थाचे रॅकेट उद्ध्वस्त करून या रॅकेट मधील दोघांना अटक केली आहे तसेच त्यांच्याकडून हेरॉईन तसेच कफ सिरफच्या बाटल्या आणि रोख रक्कम असा सुमारे ६.९० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाने आता या रॅकेटमध्ये सहभागी असलेले अंमली पदार्थाचा पुरवठा करणारे पंजाबी ट्रक ड्रायव्हर, त्यांचे हस्तक तसेच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.

कळंबोली परिसरात काही व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडू आणि त्यांच्या पथकाने कळंबोली, सेक्टर-१७मधील फिनिक्स हाईटस् बिल्डींगजवळ सापळा लावला होता.

या ठिकाणी शिवम अनिल पांडे (वय २०) अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पथकाने अनिल पांडे याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ हेरॉईन आणि वेल सिरेक्स कफ सिरपच्या बाटल्या आढळून आल्या. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने अनिल पांडे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याला फिनिक्स हाईटस् बिल्डींगमध्ये राहणाऱ्या गुरुज्योत वुलमितसिंग रंधावा उर्फ सनी (वय ३१) याने सदर अंमली पदार्थ विक्रीसाठी दिल्याचे सांगितले. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाने फिनिक्स हाईटस् बिल्डींगमध्ये छापा मारुन गुरुज्योत रंधवा याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या घराची झडती घेतली असता, त्याच्या घरामध्येदेखील हेरॉईन तसेच इतर अंमली पदार्थ विक्रीतून जमा झालेली रोख रक्कम आढळून आली. त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी पथकाने अनिल पांडे आणि गुरुज्योत रंधावा या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून ११ ग्रॅम वजनाचे हेरॉईन, १७ कफ सिरफच्या बाटल्या आणि चार लाखांची रोकड असा एकूण ६.९० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या रॅकेटने कळंबोली परिसरात अंमली पदार्थाच्या खरेदी-विक्रीला सुरुवात केल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाने या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या सर्वांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून गुरुज्योत रंधावा आणि त्याचा हस्तक अनिल पांडे या दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने या दोघांची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

दरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथकाने या कारवाईत अटक केलेल्या दोघांच्या चौकशीत त्यांना गग्गु, निंजा असे पंजाबी ट्रक ड्रायव्हर, त्यांचे हस्तक मोहसिन जेहरीवाला यांच्या मार्फत अंमली पदार्थ पुरवत असल्याचे आढळून आले आहे तसेच त्यांच्यासोबत साहील, अमनदिप सिंग, विकी रंधावासुध्दा अंमली पदार्थाची विक्री करत असल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. त्याचप्रमाणे कळंबोलीत राहणारे सनी विलखु, रिकी सिंग, करण चव्हाण, रुपसिंग हेरॉईन तसेच कोडीन बॉटलचा माल पुरवून त्याची विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी पथकाने या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात शुक्रवारी (दि.१३) शालांतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाबरोबरच वैज्ञानिक रांगोळी स्पर्धादेखील आयोजित करण्यात आली होती. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये व विज्ञान प्रदर्शनामध्ये आपला सहभाग नोंदविला. विद्यालयाच्या विज्ञान विषयाच्या शिक्षिका विशाखा गावंड यांनी या विज्ञान प्रदर्शनाचे व रांगोळी स्पर्धेचे



आयोजन केले होते.

आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, पाणीबचत, सौर ऊर्जेचा वापर, जलविद्युत निर्मिती, स्वचछ सुंदर शहर या विषयांवर आपल्या वैज्ञानिक प्रतिकृती तयार केल्या होत्या. तर वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आठवी ते दहावीतील पाठ्यपुस्तकातील महत्त्वाच्या आकृत्या रांगोळीतून काढल्या होत्या.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन न्हावा शाळेचे उपशिक्षक प्रसन्न ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक करून विविध उपकरणाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि. ७,८,११ आणि १२ डिसेंबर २०२४ रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास सानवी हॉस्पिटल खारघरच्या प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ. अमोघ शहाणे यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. यात रक्तदाब, उंची, वजन, डोळे यासारख्या तपासण्यांचा समावेश होता. डॉ. शहाणे यांनी विद्यार्थ्यांना निरोगी राहण्यासाठी आहार, स्वच्छता आणि व्यायामाचे महत्व पटवून दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वत:च्या आरोग्याबद्दल जागरुकता निर्माण झाली. पालक व विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे भरभरुन कौतुक केले. विद्यालयाच्या प्राचार्या





निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आरोग्य तपासणी शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.


























पनवेल : दत्त जयंतीनिमित्त भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तालुक्यात ठिकठिकाणी आयोजित केलेल्या जयंती सोहळ्यांना भेट देईन दर्शन घेतले. मार्गशीर्ष महिन्यातील मुख्य आकर्षण म्हणजे दत्त जयंतीचा सोहळा. यंदा दत्त जयंती शनिवारी साजरी झाली. यानिमित्त तालुक्यातील आरीवली, शिवकर, मोहोचापाडा, मोहो, पाली, दुंदरे, वावंजे, खुटक बंधन या ठिकाणच्या दत्त मंदिरांमध्ये जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या मंदिरांना भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, महेंद्र गोजे, संतोष शेळके, विनोद घरत, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

# पिक्चर सुपर हिट! पुष्पा २ चे यश काही वेगळेच








**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

सामाजिक, सांस्कृतिक वातावरण असे आहे की तुम्ही पुष्पा२च्या जाळ्यात सापडला आहात अथवा वावरताहात...लोकप्रियतेची जणू अक्राळविक्राळ लाटच जणू आली आहे. अबब म्हणावे अशीच अद्भूत व चमत्कारिक क्रेझ आहे. ही केवळ चित्रपटाची क्रेझ नाही तर अनेकांना पुष्पा २ मध्ये जणू आपला तारणहार दिसला. अनेक सामाजिक राजकीय गोष्टींनी पिचून गेलेला समाज या प्रतिक्रियेतून मोकळा ढाकळा झाला. झुंडीच्या झुंडीने प्रेक्षक पुष्पराज पाह्यला आला तितका हा चित्रपट ग्रेट भलेही नसेल पण पहिल्याच दृश्यापासून हाऊसफुल्ल गर्दीवर मोहिनी टाकण्यात आणि तीन तास वीस मिनिटे खुर्चीला खिळवून ठेवण्यात चित्रपट यशस्वी ठरतोय असा सर्व प्रकारचा मसाला त्यात खचाखच भरलाय आणि त्यातील अतिशयोक्तीसह हा चित्रपट रसिकांनी स्वीकारलाय हे सत्य आहे. प्रेक्षकांनी हा चित्रपट डोक्यावर घेतलाय ही वस्तुस्थिती आहे. त्यात हा मुळात तेलगू चित्रपट आणि मग तो हिंदीसह कन्नड तमिळ व मल्याळम भाषेत डब केलेला. तरीही त्याला मुख्य प्रवाहातील भारतीय चित्रपट अशी ओळख मिळाली. अन्यभाषिक चित्रपटांपुढे हे मोठेच आव्हान आहे.

आज मल्टीप्लेक्सला जावे, प्राईम टाईमचे सगळेच खेळ 'पुष्पा २... तेही चढत्या दरात. तिकीट दर कितीही असू देत आम्ही पुष्पा २ पाहणारच असाच जणू हा बाणा आहे. हे एक प्रकारचे झपाटलेपण आहे. सोशल मिडियात पहावे तर 'पुष्पा२'चा भारी तडका. उत्पन्नाचे भरभर वाढणारे आकडे, अल्लू अर्जुनचे पुष्पराज रुपातले फोटो, हिंदी झालेच, तेलगू (मूळ चित्रपट याच भाषेत आहे), तमिळ, कन्नड व मल्याळम भाषेतील खेळ सुटतोय तोच या पिक्चरने विलक्षण भारावून गेलेल्यांच्या उत्फूर्त, मनमोकळ्या प्रतिक्रिया, अनेकांना तर काय बोलू, किती बोलू, कसं बोलू असे झालेले. काहींनी झुकेगा नहीं साला असे म्हणत, गळ्यातून उजवा हात डावीकडे नेत आपले प्रेम व्यक्त केले. सगळेच एकदम मस्त नि भन्नाट. जणू सगळेच जण पुष्पा २ च्या दिशेनेच धावताहेत, पुष्पा २ पाहून वेडेपिसे झालेत. एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, मिडिया, सोशल मिडियातील वातावरण ढवळून काढले. त्याच्या उत्पन्नाचे भले भले मोठे आकडे येताहेत. थिएटरमध्ये पब्लिक येत नाहीत याला जणू एक चोख उत्तर यातून दिले जातेय. त्याच वातावरणात आपणही हा चित्रपट पाह्यला हवा, अन्यथा आपण समाजात मागे पडू, व्हॉटस अप ग्रुपवरील चर्चेत आपण आपले मत मांडू शकणार नाही याची भीती. तेही या भडक मनोरंजनाकडे वळले.

पिक्चर हिट, सुपरहिट होणे नवीन आहे का? अजिबात नाही. मूकपटाच्या काळापासून ते चाललय. आपल्या समाजावरील दृश्य माध्यमाची मोहिनी अफाट व अचाट आहे. आणि चित्रपटाच्या जगात यश हेच सर्वात मोठे टॉनिक ही केवढी मोठी वस्तुस्थिती. पिक्चर सुपर हिट है तो सबकुछ खुशमंगल है. ते तर छोटी भूमिका साकारणाऱ्यास देखील सुखावते. कुठेही गेलो तरी त्याच यशाच्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. शोले पन्नाशीत आहे तरी विजू खोटे आठवताना कालीयाही आठवतो, मॅकमोहन आठवताना अरे ओ सांभादेखिल आठवतो. 'जय संतोषी मा (मुंबईत रिलीज ३० मे १९७५) चे पन्नासावे वर्ष सुरू आहे, आजही त्याच्या कथा, दंतकथा, गोष्टी, किस्से आवर्जून सांगितले जातात. एका गावात थिएटरबाहेर चपला काढून भाविक हा चित्रपट पाह्यला जात. तर कुठे पडद्यावर मै तो आरती उतारु रे सुरु होताच प्रेक्षकवर्ग उभे राहून त्या आरतीत सहभागी होई. त्या काळात अनेकांनी सोळा शुक्रवारचा उपवास केला. आपल्या देशातील चित्रपट प्रेक्षक संस्कृतीत अशा अनेक गोष्टी आहेत. त्या चित्रपटाच्या वाटचालीत सपोर्ट सिस्टीम ठरल्यात. चित्रपटाच्या इतिहासाइतकेच महत्व त्याच्या प्रेक्षकांच्या वाटचालीला आहे. त्यात इंग्लिश चित्रपटाचा प्रेक्षक, मराठीचा प्रेक्षक, हिंदीचा प्रेक्षक, भोजपुरीचा प्रेक्षक, साऊथच्या पिक्चरचा प्रेक्षक, महोत्सवात चित्रपट पाहणारा प्रेक्षक, उठसूठ आपल्याकडील कोणत्याच चित्रपटाना काहीच अर्थ नाही असे म्हणणाराही प्रेक्षक अशी अनेक ग्रकारची वर्गवारी आहे.

**या सगळ्यात यशाच्या गोष्टीत बरेच रंग**

बॉबीच्या यशाने सिनेमात डिंपल कापडियाने घातलेल्या अनेक प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनाना, तशाच स्टाईलच्या कपड्यांची क्रेझ आली. बॉबी कंगवा, बॉबी लिपस्टिक अशा अनेक गोष्टींसह फूटपाथपासून सगळीकडेच मागणी वाढली. सुपर हिट चित्रपट पडद्यावर राहत नाही तो असा समाजात येतो.

'हम आपके है कौन च्या यशाने आपल्या समाजातील लग्न संस्कृती जणू इव्हेन्टस आहे हे रुजवले. आपल्या संस्कृतीत समाजातील सर्व स्तरात लग्न कार्य पूर्वापार. त्यात चालीरिती, परंपरा, मूल्य यांची छान जपणूक. हम आपके...ने त्यात अधिकाधिक रंगसंगती, देखणेपण, झगमगाट, संगीत, वराचे बूट लपवणे याचं महत्व वाढवले. मध्यमवर्गीयांनीही आपल्या कुटुंबातील लग्नाचे बजेट वाढवले. दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगेने नोकरी व्यवसायानिमित्त विदेशात गेलेले/ असलेले भारतीय अथवा तिकडेच स्थायिक असलेले अनिवासी भारतीय यांच्यातील लग्न जुळणे वाढले. आणि तेही लग्न करायला भारतात येवू लागले. लग्न लागताच काही दिवसातच नवदाम्पत्य इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिकेत झेपावताततही. चित्रपटाच्या यशाचे फंडे अनेक. सत्तरच्या दशकापर्यंत जुन्या चित्रपटातील लोकप्रिय गाणी पुन्हा पाहण्यासाठी सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृह युगात ते चित्रपट मॅटीनी शोला आल्यावर पुन्हा पुन्हा पाहिले जात. बसंत बहार, गुंज उठी शहनाई, बरसात, श्री ४२०, नौ दो ग्यारह, दो आँखे बारह हाथ, अंदाज, हम दोंनो, जागते रहो, नया दौर, कोहिनूर, चलती का नाम गाडी असे अनेक ब्लॅक अँड व्हाईट चित्रपट गाण्यांच्या लोकप्रियतेने एका पिढीतून पुढील पिढीत जात राहिले. ते वेड वेगळेच. त्यात कुठेच आक्रस्ताळेपण नाही. पडद्यावर गाणे सुरु होताच तल्लीन होऊन जायचे एवढेच ठावूक. कधी आवडत्या गाण्यासाठी पडद्यावर पैसेही उडवले जात. अनेक गाण्यांच्या जन्मकथाही अतिशय रंजक. इंपिरियल थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या अलबेला (१९५१) ची गाणी लोकप्रिय होताच दोन आठवड्यानंतर त्याची गर्दी वाढत वाढत गेली. गंमत म्हणजे, सत्तरच्या दशकात हाच 'अलबेला ' चित्र खजिना वितरणने पुन्हा प्रदर्शित करताच मागची व पुढची पिढी तो एकत्र येऊन एन्जॉय करु लागली.

सैराटचे झिंग झिंग झिंगाट गाणे पडद्यावर सुरू होताच पडद्यासमोर येत नाचण्याचा मोह अनेकांना टाळता आला नाही. त्याचे व्हिडिओ व्हायरल कधी झाले हे समजलेच नाही. आणि सैराट पाह्यला निघतानाच अनेकांची आपल्याला सीटस सोडून नाचायचेय अशी मानसिक तयारी झाली आणि अनेकांनी या नृत्याचा मनसोक्त मनमुराद आनंद घेतला. आपल्या देशात अनेकदा तरी फक्त चित्रपट पाहणे इतकेच नसते तर त्यासह अशा अगणित गोष्टी असतात. त्याचा धांडोळा केवढा तरी मोठा होईल.

रजनीकांतच्या भल्या मोठ्या कटआऊटला दूधाने आंघोळ घालणे, नवीन चित्रपटाचा पहिला खेळ पहाटे असणे, त्यासाठी ढोल ताशाच्या गजरात नाचत नाचत येणे हे म्हणजे एकादा सणच. ओटीटी युगात आजही चित्रपटगृहात जाण्यास इच्छुक असणारा मोठा वर्ग आहे हेही या साऱ्यातून दिसते.

अल्लू अर्जुनच्या पुष्पा २चे हैदराबादमधील जबरा स्वागत असेच. त्याचा भला मोठा कटआऊट, त्यावर दूध, भला मोठा हार, आवाजी फटाके, वाजत गाजत चित्रपटाचे स्वागत. आणि सोशल मिडियात या सगळ्याच्या व्हिडिओला भरपूर सकारात्मक लाईक्स, कॉमेन्टस, शेअर.

चित्रपट सुपर हिट होण्याची परंपरा एक मोठाच फ्लॅशबॅक आहे. पुष्पा २ ने लोकप्रियतेत विलक्षण उंची गाठताना प्रेक्षकांचे काही वेगळेच रुप दिसतेय, शोलेचे पन्नासावे वर्ष सुरु असतानाच शोले ते पुष्पा २ प्रेक्षक संस्कृतीतील प्रतिसादाचा बदलता रंग त्यात दिसतोय. तो चित्रपटात वेगळे प्रयोग करणाऱ्यांना अजिबात पटणारा नाही ही याची दुसरी बाजू.

# कला जिवंत करणारे व्यक्तिमत्त्व उषाताई मंगेशकर



भारतीय संगीत क्षेत्रातील एक सन्माननीय आणि नामवंत घराणं म्हणजेच मंगेशकर. या कुटुंबातील सर्वच जण गायन क्षेत्रात असले तरी त्यातील प्रत्येकाची आपली एक वेगळी अशी ओळख आहे. वेगळा एक बाज आहे. याच कुटुंबाचा एक अविभाज्य घटक म्हणजे उषा मंगेशकर... त्या गायिका तर आहेतच; पण तितक्याच ताकदीच्या चित्रकारही आहेत. आज १५ डिसेंबर रोजी उषाताई यांचा जन्मदिवस आहे. त्या निमित्ताने त्यांच्या या वेगळ्या पैलूबद्दलची माहिती देणारा आणि त्यांच्याबद्दलच्या भावना व्यक्त करणारा हा लेख...

उषाताई, म्हणजे रंगांना जिवंत करणाऱ्या कलावंत. मग ते चित्र असो, रांगोळी असो किंवा मग गाणरंग... त्यांचं नाव घेताच ही अनुभूती होते, की वय हे फक्त दार्शनिक आहे. आजही उषाताई तेवढ्याच हुरूपाने सगळी कामं करतात. त्याच उत्साहाने लतादीदींची सेवाही करतात. वयाच्या या टप्प्यावरही त्या जिद्दीने आणि तेवढ्याच ताकदीने खंबीरपणे उभ्या आहेत.

१५ डिसेंबर १९३५ रोजी सांगलीच्या भूमीत उषाताईंचा जन्म झाला मीना, लता, आशा, हृदयनाथ अशा सर्व भाऊ बहिणीमध्ये या चौथ्या. अर्थातच, त्यांचे वडील स्वर्गीय मास्टर दीनानाथ मंगेशकरांमुळे गाणं हे त्यांच्यात उपजतच होतं.अर्थात मी किंवा इतर कोणीही त्यांच्या कलेबद्दल बोलण्यास पात्र नाहीच. हे म्हणजे ज्योतीने तेजाची आरती केल्यासारखं होईल.

बालपणी उषाताई अगदी खेळकर होत्या. त्यांना क्रिकेट, सागरगोट्या आणि भातुकलीची प्रचंड आवड होती. सर्व भाऊ–बहीण एकत्र येऊन हे सर्व खेळ आवडीने खेळायचे.पुढे गाण्याच्या क्षेत्रात येतानाही ताईंनी खूप मेहनत घेतली. केवळ हिंदी आणि आणि मराठीच नव्हे, तर बांगला, नेपाळी, भोजपुरी, आसामी, गुजराती, कानडी व इतर अनेक भाषांमधून त्यांनी पार्श्वगायन केले आहे.

त्यांच्या प्रवासाची सुरुवात १९५३ सालच्या 'सुबह का तारा' चित्रपटामधील 'मेरी भाभी आई' या सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेल्या गाण्याने झाली.त्यानंतर त्यांनी लता दीदींसोबत १९५५ सालच्या 'आजाद' चित्रपटासाठी 'आपलंम चपलम..' हे द्वंद्वगीत गायलं. सिनेमा क्षेत्रातील हे पहिलं असं गाणं होतं, जे दोन बहिणींनी मिळून गायलं आणि दोन बहिणींवर ते चित्रित करण्यात आलं. त्यानंतर 'जय संतोषी माँ", मुंगळा, मराठीमध्ये 'रचिल्या ऋषीमुनींनी' आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या 'पिंजरा' या चित्रपटासाठी गायलेली सर्व गाणी आजही तेवढीच ताजी आणि आनंद देणारी आहेत. या गाण्यांमधील त्यांच्या सुरांनी रसिकजणांच्या मनामधील तारा छेडल्या आणि त्यांच्या मनात घर करून राहिल्या.

केवळ गायिकाच नव्हे, तर उषाताई तेवढ्याच ताकदीच्या चित्रकारही आहेत. विविध माध्यमं वापरून चित्र रंगवण्यात त्यांच्या हातखंडा आहे. व्यक्तीला समोर बसवून त्यांची चित्रे काढण्यावर त्यांचे प्रभुत्व आहे. त्यांनी काढलेलं मीनाताईंचं चित्र मी पहिलं, ते आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर व लता दीदी यांचीही त्यांनी काढलेली चित्रे अतिशय भावपूर्वक व जिवंत वाटतात. त्यांनी काढलेलं खूप नावाजलेलं चित्र म्हणजे शिवाजी गणेशन याचं चित्र. जे आजही सुप्रसिद्ध आहे आणि अजूनही लोकांची तारीफ मिळवत आहे.आजही जेव्हा त्या परदेशात हॉलंड, रशिया, फ्रान्स या देशांमध्ये जातात तेव्हा इतर कलाकारांची चित्रं बघून त्याचा अभ्यास करून, ती शैली आपल्या चित्रात उतरवण्याचा त्या प्रयत्न करतात.

उषाताईंच्या भाचेमंडळींमध्येही त्याच सर्वांच्या लाडक्या. कारण त्या सगळ्यांना विविध ठिकाणी पर्यटन करायला नेत असत. त्यांना स्वतःला ऐतिहासिक वास्तू, ठिकाणं आणि विविध संग्रहालय यांची खूप ओढ आहे. अजूनही त्याच दमाने उषाताई गातात आणि सर्वांची मने जिंकतात. एवढंच नाही, तर आजही इतकी वर्षं होऊनसुद्धा त्या कधीही रियाज चुकवत नाहीत. संगीत अभ्यासकांसाठी आता उषाताई 'मास्टर दीनानाथ संगीत विद्यालय' स्थापन करत आहेत. याठिकाणी सर्व संगीत अभ्यासकांनी संगीताचा अभ्यास करावा, अशी त्यांची इच्छा आहे. याचा ध्यासच त्यांनी घेतला आहे.

लता दीदींवर त्यांची भाची रचना खडीकर–शाह आणि मी एक पुस्तक केले आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने प्रभुकुंजवर माझी उषाताईंची भेट झाली. या पहिल्या भेटीत मला क्षणभरही असं वाटलं नाही, की मी त्यांना पहिल्यांदा भेटत आहे. अतिशय प्रेमाने आणि आपुलकीने त्यांनी आमचं स्वागत केलं. यादरम्यान त्यांनी दिलेल्या लिंबू सरबताची गोडी माझ्यासाठी अतुलनीय आहे..! माझ्या पुस्तकासाठी प्रत्येक पावलागणिक त्यांनी मला खूप आधार दिला आहे आणि सहकार्य केले आहे. उषाताईंकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी मला उमगल्या. एकीकडे त्यांच्यात असलेला नम्रपणा आणि दुसरीकडे त्यांचं स्वतंत्र खंबीर व्यक्तिमत्त्व, या दोन्ही गोष्टी त्यांना त्यांच्या इतर भाऊ–बहिणींमधून वेगळं करतात. आपण देशावर परिवारावर आणि स्वतःच्या अस्तित्वावर किती उदंड प्रेम करावं याचं उषाताई हे एक ज्वलंत उदाहरण आहे.

मला अजूनही विश्वास बसत नाही, की आज उषाताई ८४व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यांच्या शंभरीलाही मला त्यांची मुलाखत घेण्याचे सौभाग्य लाभावे आणि पुढील आयुष्यात त्यांच्या मायेचा आणि प्रेमाचा सहवास मिळत राहावा, अशीच प्रार्थना मी आजच्या दिनाच्या निमित्ताने करतो.

**–ह्दिम वाघोलीकर**

# समाजशास्त्रज्ञ, लेखिका इरावती कर्वे



साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या इरावती कर्वे यांची ओळख विजेत्या मानववंशशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि शिक्षणशास्त्रज्ञ अशी राहिली आहे. विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व लेखिका इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी ब्रह्मदेशातील (आताचा म्यानमार मिंगयान येथे झाला. मानवशास्त्राबरोबरच त्यांनी पुरातत्त्वविद्या आणि इतर सामाजिक शास्त्रांमध्ये उल्लेखनीय संशोधनकार्य केले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्नुषा व फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दिनकर धोंडो कर्वे यांच्या त्या पत्नी होत.

इरावती कर्वे लहान वयातच शिक्षणासाठी पुण्यात आल्या. फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना विख्यात गणिती व तेव्हाचे प्राचार्य रँग्लर परांजपे यांच्यामुळे त्या प्रभावित झाल्या. त्यांनी तत्त्वज्ञान विषयात पदवी संपादन केली. पुढे त्यांना प्रतिष्ठित असलेली मुंबई विद्यापीठाची दक्षिणा शिष्यवृत्ती मिळाली. त्यांनी प्रा. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यांच्या प्रबंधाचे शीर्षक 'द चितपावन ब्राह्मिन्स–न एथ्निक स्टडीख्र असे होते. त्यानंतर त्यांनी जर्मनीतील कैसर विल्यम इन्स्टिट्यूटमध्ये मानवशास्त्रात डॉक्टरेटची पदवी मिळवली. 'द नॉर्मल आसिमेट्री ऑफ ह्यूमन स्कलख्र हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. त्यांना तेथे त्या काळात गाजलेल्या सुप्रजननशास्त्र विषयाचे प्रा. युजेन फिशर यांचे मार्गदर्शन लाभले.

इरावती कर्वे यांनी काही वर्षे मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठात कुलसचिव म्हणून काम पाहिले. नंतर पुणे येथे डेक्कन कॉलेजमध्ये इतिहासविषयाच्या प्रपाठक या पदावर त्या रुजू झाल्या. त्यांना प्राध्यापक पदावर बढती मिळाली. डेक्कन कॉलेजमध्ये इरावती कर्वे व ह. धी. सांकलिया यांनी पुरातत्त्वविद्येमधील आजच्या मानवशास्त्रीय संशोधनाचा पाया घातला व प्रारंभापासूनच हे संशोधन जागतिक पातळीच्या दर्जाचे व्हावे म्हणून प्रयत्न केले.

इरावती कर्वे व सांकलिया यांनी गुजरातमधील लांघणज या मध्याश्मयुगीन स्थळाचे उत्खनन केले. या ठिकाणी मानवी अवशेषही मिळाले असल्याने हे संशोधन महत्त्वाचे ठरले. त्यांच्या किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया या ग्रंथात त्यांनी भारतीय समाजरचनेच्या संदर्भात अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांबद्दल स्पष्ट आणि नेमकी मांडणी केली. वांशिक व भाषिक गटांच्या दरम्यानचे फरक त्यांच्या बाह्य शरीररचनेच्या व आनुवंशिक संरचनेच्या आधारे अभ्यासता येतील का, हा त्यांच्या संशोधनाचा मूळ गाभा होता. त्याला अनुसरून कर्वे यांनी हिंदू सोसायटी :न इंटरप्रिटेशन या आपल्या ग्रंथात महाराष्ट्रातील समाजरचनेचे प्रारूप एका आकृतीत दिले आहे. याशिवाय लॅन्ड अँड पीपल ऑफ महाराष्ट्र हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ. कर्वे यांच्या वंश या संदर्भातल्या सर्व संकल्पना सध्या जरी मान्य होण्याजोग्या नसल्या, तरी त्या काळात त्यांनी केलेले संशोधन आजही महत्त्वपूर्ण आहे.

इरावती कर्वे यांना अनेक मानसन्मान मिळाले. त्यांनी दिल्ली येथील इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये मानवशास्त्र विभागाचे अध्यक्षपद भूषवले तसेच त्यांनी लंडन विद्यापीठ आणि बर्कली येथील कॅलिफोर्निया विद्यापीठ येथे विशेष व्याख्याने दिली त्यांच्या महाभारतावरील युगांत या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. पुणे येथे ११ ऑगस्ट १९७० रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

# पोलादी पुरुष : सरदार वल्लभभाई पटेल

देशाच्या राजकीय अन् सामाजिक जीवनात पोलादी पुरुष (आयर्न मॅन) म्हणून ओळख असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचो आज स्मृतिदिन. पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरात राज्याच्या खेडा जिल्ह्यातील करमसद येथे झाला अन् ब्रिटिश राजवटीला तगडं आव्हान देणारा जणू देशात पोलादी पुरुषच उदयास आला. वल्लभभाई यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई तर आईचे लाडबाबेन वयाच्या १८व्या वर्षी त्यांचा विवाह झवेरबा यांच्याशी झाला. त्यांना डाह्याभाई अन् मनिबेन ही दोन अपत्ये.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वांवर देशाला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जो लढा उभारला गेला, त्यात वल्लभभाई हे अग्रस्थानी होते. या लढ्या दरम्यान त्यांना गांधीजीसह अनेक वेळा कारावास भोगावा लागला. त्यापूर्वी इंग्लंडमध्ये बॅरिस्टर पदवी संपादन केल्यावर त्यांनी काही काळ वकिली केली, परंतु भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी वकिली सोडून थेट स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. त्यांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्षावर मोठा दबदबा होता. त्यांना राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष पद भूषविण्याचा मान मिळाला.

पारतंत्र्याच्या काळात शेतकऱ्यांवर जुलमी कर लादणाऱ्या ब्रिटिश सरकारविरुद्ध स्व.वल्लभभाई पटेल यांनी रणशिंग फुंकले. मिठाचा सत्याग्रह केल्याबद्दल इंग्रज पोलिसांकडून अटक झालेले ते प्रमुख नेते होते. महात्मा गांधी यांच्या छोडो भारत आंदोलनात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. इतकेच नव्हे तर, विदेशी मालाची होळी करून, सरदार पटेल यांनी खादीचे कपडे व स्वदेशी साहित्य वापरण्याचे भारतीयांना जाहीर आवाहन केल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. ते महान देशभक्त अन् लढवैये स्वातंत्र्यसेनानी होते. त्यामुळेच त्यांना जनमानसाकडून पोलादी पुरुष ही



उपाधी मिळाली.

विविध राज्यातील राष्ट्रप्रेमी नेते, देशभक्त सत्याग्रही अन् क्रांतिकारकांच्या समर्पित बलिदानातून अखेर भारताला स्वातंत्र्य मिळाले अन् इंग्रजांची राजवट संपुष्टात आली. स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांची गृहमंत्री म्हणून निवड झाली तसेच त्यांना उपपंतप्रधान होण्याचादेखील मान मिळाला. गृहमंत्री असतानाच्या काळात हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे देशामध्ये विलिनीकरण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यामुळे त्यांची प्रतिमा जनमानसात अधिकच उजळली. देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील भरीव योगदानाबद्दल कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांच्या नावाने विविध शैक्षणिक संस्था उभारल्या गेल्या. तसेच सरदार सरोवर ड्याम, सरदार वल्लभभाई पटेल युनिव्हर्सिटी, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, सरदार वल्लभभाई पटेल इंटरनॅशनल एअरपोर्ट आणि सर्वात प्रेक्षणीय स्थळ म्हणजे जगातील सर्वात उंच सरदार वल्लभभाई त्यांचा Statue of Unity of India हा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात आला असून, त्याचे अनावरण ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते झाले.

महत्वाचे म्हणजे ३१ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणूनही साजरा करण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला. याशिवाय त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील नेत्रदीपक कामगिरीसाठी त्यांना भारतरत्न हा किताबही बहाल करण्यात आला. देशाप्रती जाज्वल्य राष्ट्रप्रेम अन् निस्सीम देशाभिमान बाळगणाऱ्या थोर स्वातंत्र्यसेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांना पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी आदरांजली वाहून विनम्र अभिवादन केले.

**– रणवीरसिंह राजपूत,**
**सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, ठाणे**

# आपटवणे उपसरपंचपदी भाजपाच्या निर्जला दंत





**सुधागड: रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील आपटवणे येथे उपसरपंच पदाची निवडणूक दि. १३ डिसेंबर रोजी पार पडली. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे सदा नथू भस्मा आणि भारतीय जनता पार्टीच्या निर्जला नितीन दंत यांनी एका मताने विजय मिळवला.

या निवडणुकीत माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खासदार धैर्यशील दादा पाटील, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पेण, सुधागड, रोहा येथील आमदार रवीशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य राजेश मपारा यांच्या नेतृत्वाखाली भाजप सुधागड तालुका सरचिटणीस माजी सरपंच शरद चोरघे, प्रभाकर वारगुडे यांनी कठोर मेहनत घेतली. या निवडणुकीत राजेश मपारा यांच्या प्रयत्नामुळे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार सदा नथू भस्मा यांचा पराभव झाला आणि भारतीय जनता पार्टीच्या निर्जला दंत यांची उपसरपंच पदी निवड झाली.निवडणुकीच्या वेळी भारतीय जनता पार्टीचे सदस्य नीलिमा वाघमारे, कोमल वारगुडे, सुचित दंत, अनिकेत दंत, भारती फसाळे, विलास दंत, सुभाष वालगुडे,नारायण वाघमारे, चंद्रकांत गोफण, पाली नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अरिफ मणियार, वसंत दंत, सागर मोरे, कैलास दंत, विजय दंत उपस्थित होते. उपसरपंच निवड झाल्यानंतर राजेश मपारा, अरिफ मणियार , सागर मोरे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित उपसरपंच यांचे अभिनंदन केले.

## पेणमध्ये २ लाख ३३ हजारांची घरफोडी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील उंबर्डे फाटा येथे घरफोडीची घटना घडली आहे. येथील घरातून २ लाख ३३ हजार रुपयांचा ऐवज चोरी झाला आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत ६ डिसेंबर ते ७ डिसेंबर रोजी दरम्यान उंबर्डे फाटा खाचर खिंड येथे ही चोरी झाली आहे. ठाणे येथील (मुळ रा. उंबर्डे फाटा खाचर खिंड, ता. पेण) फिर्यादी यांचे राहात्या घरी चोरटण्याने घराचे मुख्य दरवाजाचा तसेच ग्रीलचे दरवाजाचा लॉक तोडुन घरामध्ये शिरून घरातील दोन्ही बेडरूममधील गोदरेजचे कपाटांचे लॉक तोडुन त्यातुन एकूण २ लाख ३३ हजार रुपये किंमतींचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम घरफोडी चोरी करुन चोरुन नेले. याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई समेद बेग हे करीत आहेत

## लोकलमध्ये तांत्रिक बिघाड; खोपोलीकरांची तारांबळ

**खोपोली: प्रतिनिधी**

लौजी व खोपोलीच्या मध्ये शनिवारी तांत्रिक बिघाडामुळे कर्जतकडून खोपोलीला येणारी व पहाटे ६.१६ वाजता खोपोली ते सीएसटी कडे जाणारी लोकल बंद पडली. लोकल सात वाजले तरी खोपोली स्थानकात आलीच नाही .लोकल न आल्याने पहाटे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या खोपोलीतील शेकडो नोकरदार , विद्यार्थी व प्रवाशांचा खोळंबा होऊन त्यांची मोठी तारांबळ उडाली.

अनेकांनी पनवेल किंवा कर्जतला जाऊन पुढील मार्ग पत्करला तर अनेकांनी घरी जाणेच पसंद केले. सिंगल पटरी असल्याने, ७:२० ची लोकल लौजीहुन परत कर्जतला पाठविण्याबाबत निर्णय घेण्यासाठी वरिष्ठांशी बोलणे सुरू असल्याचे खोपोली स्टेशन निर्देशक व प्रशासनाने सांगितले पण तांत्रिक बिघाड नेमका कोणता व का झाला या बाबत स्थानिक रेल्वे प्रशासनांकडून विस्तारित माहिती नंतर दिली जाईल असे सांगून हात झटकले

## कर्जत विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका गणित विज्ञान मंडळ पंचायत समिती शिक्षण विभाग व एल ए एस इंग्लिश मीडियम स्कूल नेरळ आयोजित ५२ वे कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन नेरळ येथे झाले . या प्रदर्शनातुन दहा प्रतिकृती जिल्हास्तरावर सहभाग घेण्यासाठी पात्र झाल्या आहेत.



विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण सोहळा सचिन राऊत नायब तहसीलदार, नितीन मंडलिक सहाय्यक पोलीस निरीक्षक नेरळ पोलीस स्टेशन शाळेच्या संचालिका स्मिता नायर, संध्या नायर गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड, विज्ञान मंडळाध्यक्ष अनिल गलगले उपाध्यक्ष, राजेंद्र सोनवणे, सचिव सात्विक बोरसे, खजिनदार ज्ञानेश्वर वाडीले,गणिताध्यक्ष अनुपमा चौधरी, केंद्रप्रमुख मोहन पाटील, रवींद्र सोनावळे, बीट समन्वयक अरुण पारधी या मान्यवरांच्या शुभहस्ते पार पडला.

प्राथमिक विद्यार्थी प्रतिकृती मध्ये प्रथम क्रमांक क्रिशा गणेश सावंत. एल ए इ एस इंग्लिश हायस्कूल व जुनिअर कॉलेज नेरळ. द्वितीय क्रमांक गावंड अर्णवी प्रवीण के एस इंग्लिश मीडियम स्कूल कर्जत. तृतीय क्रमांक वैष्णवी गणेश बोराडे माथेरान व्हॅली इंग्लिश मीडियम स्कूल. आदिवासी विभागामध्ये प्रथम क्रमांक अंजली भास्कर वाघ राजीप शाळा जुगरेवाडी माध्यमिक विद्यार्थी प्रतिकृती प्रथम क्रमांक तन्वी संतोष बुंदे एलएएस इंग्लिश अँड ज्युनिअर कॉलेज नेरळ. द्वितीय क्रमांक मीतिशा विजयकुमार यादव कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास कर्जत तृतीय क्रमांक शेख नायब याकूब हाजी लियाकत इंग्लिश मीडियम स्कूल नेरळ. आणि आदिवासी विभागांमध्ये प्रथम क्रमांक गौरव दौलत आवटी भाऊसाहेब राऊत विद्यामंदिर कशेळे. तसेच प्राथमिक शिक्षक प्रतिकृती प्रथम क्रमांक अंबिका विजय परदेशी एलइएस स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज नेरळ माध्यमिक गटात शिक्षक प्रतिकृती प्रथम क्रमांक संदीप विलास गोसावी गीता इंग्लिश अँड सेमी इंग्लिश मीडियम स्कूल खांडपे. या दहा प्रतिकृती जिल्हास्तरावर सहभाग घेण्यासाठी पात्र झाल्या आहेत.

## श्रीदत्त देवस्थान मंदिरात यात्रोत्सवाला प्रारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा येथील श्रीदत्तमंदिर येथे शनिवार दि. १४ डिसेंबर रोजी श्री दत्तजयंती यात्रा उत्सव सुरु होत आहे. दत्तजयंतीला यात्रेसाठी पंचक्रोशीतील तसेच खाडीपलिकडील श्रीवर्धन , म्हसळा व दिवेआगर या भागांतुन मोठ्या संख्येने दरवर्षी दत्त भक्त येत असतात .

स्वामी ब्रम्हेंद्र महाराज धावडशीकर यांनी अठराव्या शतकात येथील उंच टेकडीच्या माथ्यावर उंबराच्या झाडाजवळ श्री दत्त गुरुंच्या पादुकांची प्रतिष्ठापना केली .

इ.स. १९०७चया सुमारास जंजिरा संस्थानच्या सरन्यायाधिशपदी असलेल्या राजाध्यक्ष यांनी स्वखर्चाने श्री दत्तगुरुंची मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करून एक लहानसे मंदीर बांधले गेलं.१९२६-२७च्या सुमारास मंदीराचे कळस व सभागृहासह मंदीराचे बांधकाम करण्यात आले. इ .स.१९२७मध्ये पहिली जत्रा इथे भरविण्यात आली १९९७ साली मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला `.श्री दत्त मंदीर उंच डोंगरावर असुन ३०९ पायऱ्या चढुन जावे लागते. समुद्रसपाटी पासुन सुमारे ३५० मीटर उंचावर हे ठिकाण आहे . वनराजीसह नीरव शांतता असल्याने ध्यान धारणेसाठी हे योग्य ठिकाण आहे मंदीराच्या सभोवताली अडीच एकर मैदान आहे.भक्तासाठी धर्मशाळा व भक्तनिवास नव्याने काम केले आहे. ज्यांना पायऱ्या चढुन जाणे शक्य नाही अशांना १ कि.मी. अंतर पार करून थेट दत्ताचे दर्शन घडू शकते.

शनिवारी सायंकाळी ५ वा. ह .भ.प .दत्तात्रेय उपाध्ये बुवा, नाते - महाड यांचे सुश्राव्य कीर्तन व जन्मोत्सव सोहळा मोठ्या भक्ती भावाने पार पडला . तसेच. बुवा महेश सुर्वे व श्री काळभैरव प्रासादिक भजन मंडळ भंडारवाडा मुरुड यांचे सुश्राव्य भजनाला उत्तम प्रतिसाद मिळाला . रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वा. चित्रकला स्पर्धा पारितोषिक वितरण रोहन शिंदे, तहसिलदार मुरुड यांचे अध्यक्षतेखाली कला शिक्षक महेंद्र पाटील यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे .

## कर्जत चारफाटा चौक अंधारात, हायमास्ट बंद



**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई पुणे भागातून येणारे पर्यटक यांचे कर्जत तालुक्यात आल्यावर पहिले महत्वाचे ठिकाण आहे ते म्हणजे चारफाटा. मात्र हाच चारफाटा हुतात्मा भाई कोतवाल चौक गेली अनेक महिने रात्रीच्या वेळी अंधारात असतो. शासनाने कर्जत चारफाटा चौक येथे परिसर उजळण्यासाठी हायमास्ट बसविला आहे,मात्र तेथे वीज पुरवठा केल्यानांतर येणारे विजेचे बिल कोण भरणार? असा प्रश्न असल्याने वीज पुरवठ्याविना तो हायमास्ट बंद अवस्थेत आहे.

कर्जत तालुका पर्यटन तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात येणारे पर्यटकांची संख्या दररोज वाढत आहे. पूर्वी माथेरान या पर्यटन स्थळी जाण्यासाठी सुट्टीतच पर्यटक यायचे. मात्र गेल्या चार पाच वर्षात कर्जत तालुक्यात येणारे पर्यटक सुट्टी शिवाय देखील येऊ लागले आहे. मुंबई पुणे येथून येणारे पर्यटक हे कर्जत तालुक्यात येत असतात आणि त्यामुळे शनिवार रविवार कर्जत तालुक्यातील वाहतूक कोंडीचे ठिकाण म्हणून चारफाटा हा हॉटस्पॉट बनला आहे.याच चारफाटा येथून कर्जत शहरात,माथेरान नेरळ कडे तसेच कर्जत स्टेशन आणि मुरबाड कडे रस्ता जातो. त्यामुळे या चौकात वाहनांची कायम वर्दळ असते.मात्र हाच चारफाटा येथे रात्रीच्या वेळी प्रकाशमय ठेवण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. कर्जत चारफाटा येथे कर्जत नगरपरिषदेची हद्द संपते आणि पुढे दोन बाजूला हालिवली ग्रामपंचायतीची हद्द तर एका त्रिकोणातील भाग हा कर्जत नगरपरिषद हद्दीत येतो.

या चारफाटा भागाचे महत्व लक्षात घेता हा परिसर अधिक सुशोभित असावा अशी अपेक्षा आहे. कर्जत चारफाटा येथे शासनाच्या माध्यमातून काही लक्ष रुपये खर्चून उभा करण्यात आलेले विजेचा हायमास्ट बंद अवस्थेत आहे.त्या पथदिव्यांच्या विजेच्या बिलाची रक्कम कोणी भरायची हा प्रश्न समोर आला आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मधून या हायमास्ट दिव्याची उभारणी करण्यात आली आहे.मात्र हा हायमास्ट ज्या ठिकाणी बसवलेला आहे ती जागा हलवली ग्रामपंचायतीची हद्दीतील आहे. हालिवली ही एका गावाची ग्रामपंचायत असल्याने या ग्रामपंचायतीचे महसुली उत्पन्न अत्यंत अल्प आहे. त्यामुळे चारफाटा येथील विजेच्या दिव्याचे बिल भरण्याची आर्थिक ऐपत नसल्याने हालिवली ग्रामपंचायतीने त्या हायमास्ट वरील दिव्याचे बिल भरण्यास असमर्थता दर्शवली आहे.त्यामुळे चारफाटा चौकातील हायमास्ट हे बंद अवस्थेत आहे.

## पौधवाडी, माजगांववाडीला मिळाली स्मशानभूमी

### अनेक पिढ्या नदीच्या काठावर अत्यसंस्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रूप ग्राम पंचायत माजगाव हद्दित येत असलेल्या दोन अदिवासी वाडीला गेले अनेक पिढ्या अत्यसंस्कारासाठी स्मशान भुमी नव्हती, यामुळे खोपोलीहून वाहत आलेली पाताळगंगेच्या किना-यावर अत्यसंस्कार होत होते.पावसाळ्यात मोठी समस्या निर्माण होत होती

सरपंच दिपाली पाटील यांनी तेथे स्मशान भुमी बांधुन आपल्या जाहिर नाम्यात दिलेले वचन पुर्ण केले . त्याबद्दल अदिवासी बांधवांनी त्यांचे आभार मानले अनेक पिढ्या अदिवासी बांधवांची अत्य संस्कारासाठी होत असलेली गैरसोय आणि त्यांच्या वेदना या जवळून पाहील्या आहेत. त्यांच्या विविध समस्यांची जाणीव असल्यानेच सरपंच म्हणून त्यांनी हा प्रश्न मार्गी लावला. या ठिकाणी स्मशान भुमी बांधली यामुळे सरपंचासह सदस्य,ग्रामसेवक यांचे या अदिवासी बांधवांनी आभार मानले.

लोकनियुक्त सरपंच दिपाली नरेश पाटील यांनी या पदावर विराज मान झाल्यापासून विविध विकास कामाकडे लक्ष केंद्रित केले असून काही विकास कामे पुर्णत्वास झाली आहे.गावातील समस्या शोधून ते मार्गी लावण्यांचे काम करीत असल्यामुळे उत्तम महिला सरपंच या पदावर विराजमान झाल्यांची चर्चा ऐकण्यांस मिळत आहे.



## माथेरानच्या पर्यावरणावर अश्वांच्या विष्ठेमुळे विपरित परिणाम

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान सारख्या छोट्याश्या पर्यटनस्थळी असलेली घोड्यांची संख्या व त्यांच्या विष्ठेपासून येथील निसर्गाला होत असलेली हानी याकरिता माथेरान मधील सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे व केतन रामाणे यांनी हरित लवादाकडे याबाबत तक्रार दाखल करून लक्ष वेधले होते .त्यानुसार हरित लवादाने आपले कार्य सुरू केले असून माथेरानला लवादाच्या सदस्यांनी भेट देऊन पाहणी केली आहे.

तीन सदस्यीय समितीने माथेरानची पाहणी करुन समस्या जाणून घेतल्या.घोड्यांमुळे माथेरानचे पर्यावरण उध्वस्त होत असल्याने यावर उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रीय हरीत लवादाने तज्ञांची समिती गठीत केली आहे .सर्वोच्च न्यायालयाने साल २००३ मध्ये माथेरानचे पर्यावरण अबाधित राहावे या उद्देशाने माथेरान व परिसर पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केले आहे .



माथेरान येथे ब्रिटिशकाळापासून वाहनांना बंदी असून घोडा व माणसांनी ओढणारी हातरिक्षा यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी केला जातो.माथेरानचा परिसर हा सात स्क्वेअर कि.मी इतका छोटा आहे.सत्तर टक्के परिसर हा घनदाट जंगलाने व्यापलेला आहे.येथील प्रवासी वाहतुकीसाठी ४६० घोडे व मालवाहतुकीसाठी १०० ते १५० घोडे यांचा वापर केला जातो. नगपालिकेच्या तबेल्याची संख्या फक्त ६६ इतकी आहे.घोड्यांची लिद तीन टन इतकी जमा होते. त्यांची विल्हेवाट लावण्याची नगरपालिकेकडे कोणतीही यंत्रणा नाही.याचा सर्व परिणाम येथील पर्यावरणावर होत असल्याने यावर उपाययोजना करण्याची मागणी करणारी याचिका पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादाकडे केली आहे.

अँड्.तुषार कुमार यांनी याचिका दाखल करण्याचा हेतू स्पष्ट केल्यावर सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता राष्ट्रीय हरित लवादाचे न्यायाधीश शिओ कुमार सिंग व पर्यावरण तज्ञ डॉ.विजय कुलकर्णी यांनी तीन सदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले.त्यानुसार समिती मध्ये केंद्रीय पर्यावरण आणि वन खात्याचे अधिकारी, प्रदुक्षण नियंत्रण बोर्डाचे अधिकारी तसेच मुख्याधिकारी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांचा समावेश आहे. पर्यावरण खात्याचे डॉ धुरू,प्रदुक्षण नियंत्रण बोर्डाच्या ऋतुजा भालेराव,माथेरान नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत शारलोट लेक, दस्तुरीनाका येथील बोरीचे मैदान व सिम्पसन टैंक व इतर परिसराची पाहणी केली त्यांचा अहवाल व कोणत्या उपाययोजना करता येतील याचा अहवाल राष्ट्रीय हरित लावादाला सादर केला जाणार आहे.

**नावात बदल**

माझे लग्नापूर्वीचे नाव **सुवर्णा प्रमोद जामनेरकर,** हे माझे जुने नाव असून, मी लग्नानंतर **गॅझेट (राजपत्र) क्र. एक्स-९८६२ दि. ११ सप्टेंबर २००३** नुसार **सुवर्णा रणजित पुराणिक** असे बदलले असून, मी **सुवर्णा रणजित पुराणिक** या नवीन नावाने ओळखली जाईन.

**सही/-**
**सुवर्णा रणजित पुराणिक**
नवीन नाव

## निवडक

### अनधिकृत बांधकामावर कारवाई



**नवी मुंबई :** अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्राअंर्तगत असलेल्या नेरूळगाव, नेरूळ येथील तीन अनधिकृत इमारतींवर निष्कासन कारवाई करण्यात आलेली आहे. अनधिकृत इमारतीवर निष्कासन कारवाई सिडको व नमुंमपा यांची संयुक्त कारवाई, नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग कार्यालय सहा. आयु तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर यांचे समवेत,पोलीस बंदोबतात करयात आले. यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई तिव्र करण्यात येणार आहे.

### अविनाश म्हात्रे यांना पुरस्कार



**मोहोपाडा :** जागतिक मानव अधिकार दिनाचे औचित्य साधून समाजसेवा, कुष्टमित्र अविनाश चिंतामण म्हात्रे यांना समाजसेवा रत्न २०२४ या पुरस्काराने जागतिक मानव अधिकार सुरक्षा फांउडेशन दिल्ली (भारत) यांनी क्षेत्र त्रंबकेश्वर नाशिक येथे सन्मानित करण्यात आले. अविनाश म्हात्रे यांचे समाजसेवेचे कार्य हे अतुलनीय असून पत्रकारिता आणि त्यांच्या विविध सामाजिक कार्याचा उल्लेख वाखाणण्याजोगा आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कंठानंद स्वामी, अध्यक्ष रामकृष्ण आरोग्य संस्थान, संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आहेर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष राम घरत,राष्ट्रीय महासचिव राजेंद्र मोरे, राष्ट्रीय कमिटीचे वाल्मिक जाधव आदी उपस्थित होते.

### निलीमा पाटील पुरस्काराने सन्मानित



**पनवेल :** टेंभोडे येथे राहणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या तसेच वर्चस्व युवा फाऊंडेशन महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा, नारीशक्ती सामाजिक महिला संस्था महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा, जनहित सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षा व शिव स्वराज्य संस्था रायगडच्या महिला संपर्कप्रमुख निलीमा संदीप पाटील यांना पुणे आदर्श क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, सन्मान रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला बाळराजे वाळुंजकर, ऋतुजा पाटील, अन्वि अनिल घाडगे, जान्हवी राजे पाटील, वित्रा दिक्षित, अनिता चेतन घाडगे, ॲड.निता शेळके आदी उपस्थित होते.

### प्रवीण ठाकूर यांचा सत्कार



**उरण :** पनवेल शहर उप तालुका प्रमुख प्रवीण ठाकूर यांच्या हस्ते वाघिवली येथे क्रिकेट सामन्यांचे उद्घाटनप्रसंगी जय हनुमान क्रिकेट संघाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती असलेले प्रवीण ठाकूर यांनी आजपर्यंत अनेक विविध क्रिकेट सामन्यांसाठी सढळ हाताने मदत केली आहे. क्रिकेट खेळाला तसेच खेळाडूंना नेहमी प्रोत्साहन दिले आहे. राजकारण तसेच समाज कारणात नेहमी ते सक्रिय आहेत. त्यामुळे विविध क्रिकेटच्या संस्था संघटना कडुन त्यांचा नेहमी सत्कार केला जातो.

# हत्तीरोग दुरीकरणाच्या औषधोपचार मोहीमेचा केंद्रीय पथकातर्फे आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यात हत्ती रोग दूरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहिम पनवेल महापालिका क्षेत्रात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली ९ डिसेंबर ते १४ डिसेंबर पर्यंत सुरू आहे. या मोहीमेंतर्गत सुरू असलेल्या सर्वेक्षणाचा केंद्रीय पथकाने रोहिंजण येथे नुकतीच भेट देऊन आढावा घेतला. या वेळी त्यांनी महापालिका करत असलेल्या कामाचे कौतुक करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले.

या वेळी राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम दिल्ली येथील संचालक डॉ. तैनू व त्यांचे पथक तसेच सहसंचालक आरोग्य सेवा पुणे येथील डॉ. बबिता कमलापूरकर, हिवताप व वैद्यकीय आरोग्य सेवा ठाणे येथील सह संचालक डॉ. बी. एस. सोनावणे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजाराम भोसले, पनवेल महापालिकेचे साथरोग अधिकारी डॉ. आकाश ठसाळे उपस्थित होते.

या मोहीमेंतर्गत हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यातील पाच लाख लोकसंख्येप्रमाणे ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन करून सर्वेक्षण करण्यात येत आहेत. या अनुंषगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १४ कामोठे नौपाडा, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १० रोहिंजण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तळोजा फेज २ पाचनंद, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खांदा कॉलनी टेंभोडे-पडघे या विभागाची निवड करण्यात आली आहे. येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येत असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे.

या मोहिमेंतर्गत निवडलेल्या प्रत्येक भागासाठी २ टीम तयार करण्यात असून प्रत्येक टीम मध्ये २ आरोग्यसेवक आहेत. या टीमच्या माध्यमातून स्थानिक आरोग्य सेविका व आशा यांचे सहकार्य घेऊन रात्री ८ ते १२ यावेळेत रात्र रक्तनमुने घेण्यात येत आहेत. केंद्रीय स्तरावरून आढावा घेण्यास पथकाने या मोहिमेसाठी महापालिकेने केलेल्या नियोजनाचे तसेच आशांना दिलेल्या प्रशिक्षणाचे, प्रचार प्रसिद्धचे एकुणच मोहीमेच्या अमंलबजावणीच्या पध्दतीचे कौतुक करून आशा सेविका करत असलेल्या कामाची प्रशंसा केली.

# खारघरमध्ये कोल्हा आणि कुत्रा एकत्रित कॅमेऱ्यात कैद

**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर शहरात सोनेरी कोल्हा आणि कुत्रा एकत्रित बागडताना अनोखे दृश्य दिसले आहे. पाणथळ जागेत नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात सोनेरी कोल्हे पाहिले जात असल्याचे पहावयास मिळत असताना. गुरुवारी (दि.१२) प्राणिमित्रांना हे अनोखे दृश्य पहावयास मिळाले.

खारघर सेक्टर १६ याठिकाणी सध्या पडणारी गुलाबी थंडी यामुळे मोठ्या प्रमाणात सोनेरी कोल्हे खारघर शहरात खाडीकिनारी पाहिले जात आहेत. देशी विदेशी पक्षांचे आगमन खाडीकिनारच्या पाणथळ जागेत होत असल्याने पक्षी आणि प्राणिमित्रांना शहरात या निरीक्षणाची पर्वणी निर्माण झाली आहे. सोनेरी कोल्हे भक्ष्याच्या शोधात नजीकच्या मानवी वस्तीत दिसू लागले आहेत. यापूर्वी सेंट्रल पार्क मध्ये पाहिले गेलेले कोल्हे गुरुवारी सकाळी कुत्र्यासोबत बागडताना दिसून आले.

सेक्टर १६ वास्तुविहार सोसायटीच्या मागील बाजूस सकाळी ७च्या सुमारास कोल्हा आणि कुत्रा दिसून आला.



खारघर खाडीत मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. विशेष म्हणजे खारघर आणि तळोजाला जोडणारा खाडीपुलाचे काम याठिकामी युद्धपातळीवर सुरु आहे. यामुळे होणाऱ्या आवाजामुळे खारफुटीतील सोनेरी कोल्हे खारघर शहरात शिरकाव करीत आहेत.

> विकासाच्या नावाखाली शहरात मोठ्या प्रमाणात निसर्गाचा ह्रास सुरू आहे. खारफुटीचे जंगल दररोज तोडले जात असल्याने कोल्हे मानवी वस्तीत येत आहेत. यामुळेच मोकाट कुत्र्यांच्या कळपात कोल्हे शिरत आहेत. हे धोकादायक असून वनविभागाने याबाबत वेळेत पाऊले उचलावीत.
>
> **–ज्योती नाडकर्णी,**
> प्राणीमित्र, खारघर

# पनवेल रेल्वे स्थानकावर स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एसआयईएस (नेरूळ) कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या (स्वायत्त) आजीवन शिक्षण व विस्तार विभागातर्फे (डीएलएलई) १२ डिसेंबर २०२४ रोजी पनवेल रेल्वे स्थानकावर सकाळी ८.३० ते दुपारी १२ या वेळेत स्टेशन स्वच्छता अभियान व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

रेल्वे स्थानकांवर स्वच्छतेचे महत्त्व आणि काय करावे आणि काय करू नये याविषयी जनजागृती करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. ईईपी आणि सीजीपीने या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सकाळी साडेआठ वाजता सर्व स्वयंसेवक पनवेल रेल्वे स्थानकावर दाखल झाल्यानंतर कार्यक्रमाला अधिकृत सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी आखलेला पहिला कार्यक्रम म्हणजे स्वच्छता अभियान. स्वच्छता अभियानासाठी २७ विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. डीएलएलईने पुरवलेले हातमोजे आणि मास्क चा अपवाद वगळता, स्टेशन कर्मचाऱ्यांनी आम्हाला स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी दिल्या.




हे स्वयंसेवक रेल्वे स्थानकावर विखुरले आणि स्वच्छतेविषयी पोस्टर्स लावत स्वच्छ स्थानक राखण्याबाबत माहिती देण्याचे काम केले. समाजबांधवांना स्वच्छता अभियानाची माहिती असून त्यांनी रेल्वे स्थानकातील कचरा थांबविण्याची गरज व्यक्त केली. सकाळी अकरा वाजेपर्यंत स्थानकाची साफसफाई करण्यात आली.

या रॅलीत २३ मुलांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवला, हा दुसरा उपक्रम होता. रॅली परेडदरम्यान या स्वयंसेवकांनी रेल्वे स्थानकांवर रेल्वे रुळ ओलांडू नये, काय करावे आणि काय करू नये याविषयी पोस्टर्स दाखवले आणि घोषणा दिल्या. ही रॅली प्रत्येक प्लॅटफॉर्मवर आणि संपूर्ण स्टेशनवर झाली. या रॅलीमुळे कार्यक्रमाची सांगता झाली.

# ‘सीकेटी’ मराठी माध्यमाच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल येथील मराठी माध्यमाचा वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२०२५चा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि.१३) झाला.

चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांच्या हस्ते व विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली या क्रीडा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ झाला. इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या हस्ते क्रीडा ध्वजाचे आरोहण करण्यात आले. तसेच प्रशांत मोरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढले. त्यानंतर राज्य, विभाग, जिल्हास्तरावर विजय संपादन केलेले विद्यार्थी स्नेहा भोसले, महिमा महाडिक, शुभ्रा पवार व इतर खेळाडू या विद्यार्थ्यांनी आणलेली क्रीडा ज्योत मान्यवरांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली.

या वेळी संगीत विभागाच्या अर्चना पाटील व संतोष खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी क्रीडा गीत सादर केले. चारही हाऊसचे कुलप्रमुख, कॅप्टन्स व विद्यार्थी यांनी क्रीडा प्रतिज्ञा घेतली. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजक म्हणून प्रताप शिंदे, विलास यशवंतराव, ज्योती बडवी यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन सारिका दिवेकर यांनी केले.



# शिवाजीनगर येथे बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात भजन, किर्तन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवाजीनगर येथील श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात श्री. रामशेठ ठाकूर ग्रामस्थ मंडळ संयोजित, देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) यांच्यातर्फे गुरुचरित्रामृत ग्रंथ, श्री दासबाधे ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचा पारायण सोहळा १३ ते १५ डिसेंबररदरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

यामध्ये शुक्रवारी (दि.१३) सकाळी बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावेखाडी (उत्तरपाडा) यांचे संगीत झाले. त्यांना गणपत ठाकूर, नितीन ठाकूर यांनी बुवा व आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे यांनी पखवाजासाठी साथ दिली. यानंतर स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, भागवत साहेब, पुणे, हभप आप्पा पांचाळ, चिपळूण, रमण ठाकूर, न्हावाखाडी, अरुणशेठ ठाकूर यांचे प्रवचन झाले. दुपारी भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर यांचे भजन झाले. या वेळी गायिका रत्नप्रभा घरत, हिरूबाई घरत, चंद्रप्रभा घरत, आनंदी घरत होत्या. तसेच श्री. गुरूकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर यांचे भजन झाले या वेळी सुप्रिया घरत आणि मंडळी गायक होते तर पखवाज तुषार घरत यांनी वाजविला.

यानंतर संत जनाबाई प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन झाले. या वेळी गायिक पुनम ठाकूर, रूपम वास्कर, हर्षद फडके हे होते. तर पखवाज मधुकर धोंगडे, केतन फडके यांनी वाजविला. सायंकाळी दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर यांचे भजन झाले. या वेळी बुवा वसंतशेठ पाटील, नितीन ठाकूर होते. तर पखवींज गौरव म्हात्रे व तुकाराम कोळी यांनी वाजविला. रात्री हभप पुरूषोत्तम महाराज घाटाव (रोहा) यांचे किर्तन झाले. यानंतर रात्रीचे बारा अभंग सर्व गुरू बंधू भगिनींनी म्हटले.





# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात इंग्रजी विभागातर्फे फेब्रु/मार्च २०२५ एचएससी बोर्ड परीक्षा देणाऱ्या इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाचे मार्गदर्शनपर व्याख्यान शुक्रवारी (दि.१३) आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी परेल मुंबई येथील सोशल सर्विस लीग ज्युनिअर कॉलेज च्या प्राध्यापिका तसेच एच एस सी बोर्ड परीक्षा २०२४ च्या इंग्रजी विषयाच्या चीफ मॉडरेटर अनिता पाटील रिसोर्स पर्सन म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भीती कशी दूर करायची, पेपर योग्य वेळेत कसा सोडवायचा, इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण कसे मिळवायचे, पेपर लिहिताना अचूक सादरीकरण कसे करायचे, व्याकरणामध्ये पैकीच्या पैकी गुण कसे मिळवायचे, यासारख्या इंग्रजी विषयातील अनेक बाबींचे मार्गदर्शन त्यांनी आपल्या व्याख्यानातून केले.

आर्ट्स विभागातील ५८ विद्यार्थी तर आर्ट्स कॉमर्स व सायन्स विभागातील ६२ टॉपर्स विद्यार्थी तसेच इंग्रजी विभागातील सर्व शिक्षक या व्याख्यानासाठी उपस्थित होते. व्याख्यानादरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून हे व्याख्यान अधिक परिणामकारक झाले. इंग्रजी विभागातर्फे या व्याख्यानाचे अतिशय नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले.

व्याख्यानासाठी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात म्युच्युअल फंड विषयावर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने म्युच्युअल फंड वरती सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी एचडीएफसी बँक खारघर येथील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना म्युच्युअलफंडबद्दल तसेच इतर गुंतवणूक, शेअर मार्केटिंग याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्राचा फायदा सर्व शिक्षक व शिक्षकेतर करण्यात कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या गुंतवणूकीसाठी होणार आहे. या सत्राचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच प्रा. प्रतीक्षा पाटील तसेच स्टाफ वेल्फेअर समितीतील इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# माणगाव डंपिंगची आग विझविण्यात यश

## ◆ कचऱ्याच्या योग्य विल्हेवाटीसाठी विशेष प्रयत्न करणार

**माणगांव : वार्ताहर**

नगरपंचायत हद्दीतील उतेखोल येथिल कचरा डंपिंगला वारंवार लागणाऱ्या भिषण आगीमुळे परिसरात धूरकं पसरून लगतच्या वनवासी आश्रम शाळेतील शालेय विद्यार्थी तसेच शहरातील नागरिकांना त्याचा त्रास होत होता त्याचे वृत्त प्रसिद्ध होताच त्याची त्वरित दखल घेत आग नियंत्रणात आणण्यात आली. मुख्याधिकारी संतोष माळी कनिष्ठ अभियंता आकाश बुवा, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उप नगराध्यक्षा हर्षदा सोंडकर नगरसेवक कपिल गायकवाड, राजेश मेथा, अजित तार्लेकर, सचिन बोंबले, शहर समन्वयक अतुल जाधव, स्थानिक युवा कार्यकर्ता सौरभ खैरे, पत्रकार रवि कुवेसकर यांनी डंपिंग येथे जाऊन परिस्थितीची पाहणी करुन आश्रमशाळा मुख्याध्यापक अरुण पाटील यांची भेट घेऊन त्यांना समस्या दूर करण्यात येईल असा दिलासा दिला आहे. नगरपंचायत अग्निशमन शिघ्र प्रतिसाद टीमचे प्रकाश मोरे, सारंग कनोजे



व कर्मचाऱ्यांच्या तीन दिवस अथक प्रयत्नातून सध्या आग शमविण्यात आली व विषारी धूर येणे तुर्तास बंद झाल्याची माहीती त्यांनी दिली आहे. येथील मोठ्या प्रमाणातील कचरा काढून उचलण्यास काही कालावधी जाईल, समस्या कायम स्वरुपी सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरु असल्याचे मुख्याधिकारी माळी यांनी सांगितले आहे.

डंपिंग आणि प्रदूषणाचे वृत्त प्रसिद्ध होताच नगरपंचायत अँक्टीव्ह मोडवर आली आहे. खरतर संपूर्ण शहरातील कचरा ग्रामपंचायत काळापासून ते नगरपंचायतीची दहा वर्ष ज्या ठिकाणी डंपिंग करतात ती जागा खाजगी आहे. नविन बांधलेला कचरा प्रकल्प येथून जवळच असुन तिथेच कचरा प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात येणार आहे. तसेच डंपिंग करणेच बंद हेच उद्दिष्ट ठेऊन जानेवारी २०२५ पासून स्वतंत्र एजन्सीकडून हा प्रकल्प सुरु करणार असल्याची माहीती मुख्याधिकारी यांनी दिली आहे. या मोकळ्या मैदानात लाखो टन कुजलेले प्लास्टिक व अन्य कचरा इतरस्त्र विखुरला असुन काही ठिकाणी रस्त्यावर व आदिवासी वाडी मार्गावर देखील कचरा पडलेला आहे.

मोकाट गुर, कुत्री, जनावरे, जीव, जंतू कावळ्यांचा येथे वावर असून अत्यंत दुर्गंधी पसरली आहे. पावसाळ्यात येथे पडणारे पाणी थेट काळनदीत जाऊन मिसळते असे विदारक वास्तव आहे. शासनाकडून काही वर्षांपूर्वी शून्य कचरा अभियानांतर्गत नगरपंचायतीला कागदोपत्री शून्य कचरा दाखवून पुरस्कार प्राप्त झाला असल्याची माहीती समोर येत आहे. मात्र कचरा डंपिंगचे वास्तव भयानक आहे.

खरतर अशा प्रकारे नगरपंचायत हद्दीत कचरा डंपिंग करणे मनाई आहे. कचऱ्यावर मायनिंगची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणेच बंधनकारक असल्याची माहिती समोर येत आहे शासनाचा मोठा निधी यासाठी उपलब्ध आहे. केवळ दिखाऊ इव्हेंट स्वच्छता अभियाने संपन्न होतात, परिस्थीती मात्र विदारक जैसेथे असल्याचे चित्र आहे.

माणगांवकर नागरिकांमध्ये अजुनही शहराच्या स्वच्छतेविषयी उदासिनताच पहावयास मिळते, लोकगुपचूप कचरा प्लास्टिक पिशव्या मध्ये भरुन रस्त्यालगत, नदीत, कालव्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी नेऊन टाकतात. कोट्यावधीचा निधी स्वच्छतेवर खर्च होतो, स्वच्छता सेवक अहोरात्र कष्ट करतात परंतु घंटागाड्या येऊन देखील विविध ठिकाणी कचऱ्याचे ढीग पाहावयास मिळत आहेत. मोठ्याप्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रियाकरुनच योग्य नियोजनातून स्वच्छ माणगांव, सुंदर माणगांव संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी सर्वांचा सकारात्मक, स्वयंस्फूर्त प्रतिसाद ही काळाची गरज आहे.

## मोटररसायकल अपघातात तरूणाचा मुत्यू





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड हद्दीतील निसर्ग हॉटेल जवळच्या रस्त्यावरच्या वळणावर शनिवारी सकाळी मोटारसायकल व एसटी बसची समोरा समोर ठोकर लागुन झालेल्या अपघातात मोटारसायकल चालकाचा मुत्यु झाला.तरुण व्यक्तीचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळ हळ व्यक्त केली जात आहे.

मुरुड रेवदंडा मार्ग महाड करिता एसटी बस डेपोतुन सकाळी ८.०० वाजता चालक अविनाश मोहन दिघे वय ४१ घेऊन निघाले असता पाच मिनिटांवर निसर्ग हॉटेलचे समोरील अरुंद व वळणावरील रस्तावर मोटारसायकल चालक अरमान सलीम दखनी वय १८ वर्षं मुरुड अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज मधील एफ वाय बीएससी मध्ये शिकणारा विद्यार्थी आपल्या

वडीलाची मोटारसायकल क्रमांक एम एच ०६ सी जे ००१७ घेऊन निसर्ग हॉटेलच्या रस्तावरून वळणावर येत असताना भरधाव एसटीची मोटारसायकलला जोरदार धडक बसल्याने मोठा अपघात होऊन मोटारसायकल चालकांच्या डोक्यालालागुन रक्तस्राव होऊ लागला.तात्काळ मोटारसायकल चालकांला मुरुड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले परंतु वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम यांनी त्याला मयत घोषीत केले.

अपघाताची माहिती मिळताच मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन या अपघाताची चौकशी केली. एसटी चालक अविनाश दिघे यांच्या वर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१)१२५,(अ)(ब)२८१,सह मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ या नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षकविजयकुमार देशमुख करित आहेत.

## उभ्या वाहनाचा टायर पंक्चर काढताना दुचाकीची धडक

**चार जखमी तर एक जण ठार**

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर शुक्रवारी केंबुर्ली जवळ पंक्चर झालेल्या वाहनाचे टायर बदलत असतानाच महाडकडे येणाऱ्या भरधाव मोटार सायकलने चार जणांना धडक दिली. या अपघातामध्ये एक जण ठार चार जण जखमी झाले आहेत. याबाबत दूचाकीस्वारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई गोवा महामार्गावर केंबुर्ली गावच्या जवळ एम एच ०८ ए पी ३३५२ या टेम्पोचा टायर पंक्चर झाल्याने टायर बदलण्याचे काम सुरू होते. त्याच दरम्यान महाड दिशेने येणारी एम एच ०६ बी जे ४५३४ ही मोटरसायकल भरधाव वेगात टायर बदलणाऱ्या चौघांवर आदळली. या अपघातामध्ये यशवंत हरिश्चंद्र महाप्रळकर वय ६५ हे उपचारासाठी नेत असतानाच मयत झाले. तर टेम्पोचा टायर बदलणारे फिराश उमर मुगरूसकर रा. म्हाप्रळ, शिवम शिवदास साळी रा. म्हाप्रळ बौद्धवाडी, आकीब अब्दुल मजीद मुगरूसकर रा. म्हाप्रळ, तर आरोपी सूरज चंद्रकांत सावंत हे चौघेजण गंभीर जखमी झाले आहेत.

हा अपघात ( दि. १३) रोजी झाला. याबाबत दुचाकीस्वार सुरज चंद्रकांत सावंत राहणार खैरे महाड याच्यावर भारतीय न्याय संहिता १०६ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आमदार रविशेठ पाटील यांची नागोठणेत सदिच्छा भेट



**नागोठणे : बातमीदार**

पेण सुधागड रोहा मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांनी श्री दत्त जयंतीचे औचित्य साधून नागोठणे शहरास सदिच्छा भेट दिली.

आमदार रविशेठ पाटील यांच्या समवेत राष्ट्रवादीचे नेते नरेंद्रशेठ जैन, भाईसाहेब टके, भाजप नेते मारुती देवरे, अनंत वाघ, माजी सरपंच प्रकाशशेठ जैन, मिलिंद धात्रक, कमलाकर मोकल, भाजप ता. सरचिटणीस आनंद लाड, शहर अध्यक्ष सचिन मोदी, सिराज पानसरे, ता. क्रीडा संयोजक शेखर गोळे,सुभाष पाटील, नागोठणे ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया काकडे, सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, ऍड. प्रकाश कांबळे, सचिन ठोंबरे, संजय काकडे, संतोष चितळकर, मंदार चितळे, राजन दुबे, धनराज उमाळे, प्रविण जैन, व्हाईट लोटस हॉस्पिटलचे उपाध्यक्ष घनश्याम कदम, मुख्य व्यवस्थापक गणेश राणे आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी शहरातील श्री दत्त मंदिर, ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर, पोलिस स्टेशन मधील श्री दत्त मंदिर व रामनगर मधील श्री दत्त मंदिरात जाऊन श्री दत्त महाराजांचे दर्शन घेतले तदनंतर उपस्थित महायुतीच्या कार्यकर्त्यांशी विविध विषयावर चर्चा केली.

## माणगावला आरटीओ कार्यालयाची प्रतिक्षा, पाठपुरावा यशस्वी

### आ.भरत गोगावले, आ.आदिती तटकरे यांची १६ कोटींची आर्थिक तरतूद

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव हे मध्यवर्ती ठिकाण आहे. येथे दक्षिण रायगडसाठी आर. टि.ओ. कार्यालय व्हावे यासाठी संजय अण्णा साबळे यांनी गेली २० वर्षे पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. यासाठी आ. भरत गोगावले आणि आदिती तटकरे यांनी सुमारे १६ कोटी रुपयांची अर्थिक तरतूद केली असुन ही अद्याप दक्षिण रायगड जिल्ह्यातील वाहनचालक आर.टि.ओ. कार्यालयाच्या प्रतीक्षेत आहेत. उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी माणगावातील मुंबई गोवा महामार्गा जवळील माणगाव शहरापासून केवळ ३ किमी अंतरावर असणाऱ्या मुगवली फाट्या नजीक असणाऱ्या जावळी येथील गट क्रमांक ७३ मध्ये सुमारे १५ एकर गुरुचरण जमीन महाराष्ट्र शासनाने आरक्षित केली आहे. जमीन आरक्षित करण्यासाठी शहरातील माणगाव तालुका रिक्षा व मिनी डोअर चालक आणि मालक संघटनेचे अध्यक्ष संजय अण्णा साबळे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुनील तटकरे, एसटी महामंडळाचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले आणि आमदार आदिती तटकरे यांना वेळोवेळी निवेदने देऊन या समस्येकडे लक्ष वेधले होते. हे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय झाल्यास दक्षिण रायगड जिल्ह्यातील ११ तालुक्यातील वाहनचालक आणि मालक यांना लाभ मिळणार असल्याने पेण येथे जाण्यासाठी त्रास संपणार आहे.

दक्षिण रायगड जिल्ह्यातील माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, रोहा, मुरुड, पाली सुधागड अशा ९ तालुक्यांना तसेच पेण आणि अलिबाग अशा २ तालुक्यांतील काही अंशी भागातील वाहन चालकांना लाभ मिळणार आहे. उर्वरित तालुके पनवेल येथे मुख्य प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी जोडले आहेत. रिक्षाचालक हलाखीची असते. केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नाईलाजाने रिक्षा चालवून पोट भरीत असतो. त्यामुळे त्यांना पेण येथे जाताना खिसे रिकामे करून जावे लागते. त्यामुळे जावळी येथील शासकीय वसतीगृहात तातडीने तात्पुरती दालने आणि कक्ष उपलब्ध करून देण्यात आली तर हे कार्यालय सुरू होऊ शकते असे संजय अण्णा साबळे यांनी सांगितले.

सध्या हे परिवहन कार्यालय पेण येथे असल्याने वाहनांची तपासणी आणि वाहनासंबधी कामांसाठी लांब अंतराचा पल्ला गाठण्यासाठी खड्ड्यातून तारेवरची कसरत करुन जावे लागते. मुंबई गोवा महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असल्याने पेण येथे जाताना वाहनांचे नुकसान झाल्यास परत फिरावे लागते.

याबाबत पेण येथील उपप्रादेशिक सहायक परिवहन अधिकारी सुर्यवंशी यांनी सांगितले की, माणगाव येथे आरटीओ कार्यालय सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नाशिक येथील प्रादेशिक परिवहन कार्यालया प्रमाणे आधुनिक आणि अद्ययावत कार्यालय होणार आहे. यापूर्वीच वाहन पासिंग ट्रेकसाठी मंजुरी देण्यात आली आहे. नवीन कार्यालय होण्यासाठी सर्वोतोपरी मदत आणि सहकार्य करु.

**पैसे आणि वेळ यांची बचत होणार**

**पेण पासून पोलादपूर, श्रीवर्धन १२५, महाड, म्हसळा १००, माणगाव, मुरुड, तळा ७५, रोहा, सुधागड ५० किलोमीटर इतके मोठे अंतर आहे. मध्यवर्ती अशा माणगाव येथे आर. टि.ओ. कार्यालय झाल्यास हेच निम्मे होऊन पैसे आणि वेळ यांची बचत होईल असे रिक्षा संघटनेचे अध्यक्ष संजय अण्णा साबळे यांनी सांगितले.**

## नवाब कालीन गारंबी धरणाचा विकास झाल्यास पर्यटन वाढीस चालना मिळेल

**मुरुड : रामप्रहर व्रुत्त**

मुरुड शहराला व नांदगाव पंचकृषी व शेतीसाठी लागणारे पाणी नवीन झालेल्या खरआंबोळी धरणातून मुबलक प्रमाणात सुरु आहे .पूर्वी हे गारंबी धरणातून होत असे म्हणुन पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असे . खरआंबोळी धरण झाल्यावर पाणी टंचाई संपली आज पावसाळी गारंबी धरणातील पाणी ओव्हरफ्लो होऊन समुद्रात जाते त्याच फुकटजाणाऱ्या पाण्याचा वापर पर्यटनासाठी केला तर परिसरातील गावांचा आर्थिक विकास साधता येईल

गारंबी परिसर नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे ,गर्द झाडीने व्यापलेला असल्याने परिसरात दिवसादेखील अंधार असतो काळ्या दगडावरून आवाज करत वाहणारे पाणी विविध पक्ष्यांचा येणार कोमल आवाज ,व औषधी वनस्पतींची हजरो झाडे अशा परिसरात नियोजबद्ध पर्यटन विकास केल्यास मुरुडकडे येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात

**पावसाळी फुकट जाणारे पाणी पर्यटनासाठी वापरावे**



वाढेल .विकासात वनखात्यानी मदत केली तर जलक्रीडेसोबत अभयारण्यचा आस्वाद पर्यटकांना घेता येणार आहे

गारंबी धारणा इतिहास आहे .जंजिरा संस्थानाचा पुरोगामी विकास करणारे सर सिद्दी अहमदखान यांनी विक्टोरिया राणीच्या भारत भेटीची आठवण म्हणून गारंबीच्या जंगलातील धरणास विक्टोरिया ज्युबीली वॉटर वर्क्स हे नाव दिले. वपुल वनसंपत्ती नैसर्गिक पाणी अडवून बांधलेले हे धरण गारंबी धरण म्हणुन प्रसिद्ध आहे. शहरास पिण्याचे पाणी याच ठिकाणावरुन पुर्णपणे नैसर्गिक प्रवाहाच्या वेगाचा वापर करुन आणले जात होतते सध्या मे अखेरीस आंबोली धारांचे पाणी कमी पडल्यास गारंबीचा पाणी वापरण्यात येते

पर्यटक पाण्याच्या प्रवाहांत डुंबण्यासाठी हमखास या ठिकाणी जातात. वनभोजनासाठी हे ठिकाण आदर्श आहे. पाण्याचा मुळ प्रवाह दुषित न करण्याचे सामंजस्य बाळगुन निसर्गाचा आनंद घेण्यास कोणतीच हरकत नाही. दरीत उतरणारी जांभ्या दगडातील पायवाट, चहुबाजूस प्रचंड वृक्षराजी मोठ मोठे खडक, वाहत्या पाण्याची गाज, पक्ष्यांची किलबिल यामुळे पर्यटक गारंबी परिसरात खिळून जातो.

मुरुड गारंबी मार्गे रोहा रस्ता झाल्याने पुणे कोल्हापूर परिसरातील पर्यटक ह्या जंगल मार्गे आनंदाने प्रवास करतात .पावसाळ्यात सर्व परिसर हिरवाईने नटलेला असतो .हल्ली पर्यटकांना भिजण्याचा व पोहण्याचा आनंद घेण्यासाठी ठिकाण पाहिजे असते .जर गारंबी धरणाचा विकास झाला .तर मुरुड शहरातील बेरोजगारांना काम मिळेल. गारंबी मुख्य धारणखाली सद्य ३ छोटे बंधारे आहे .तसेच अजून २ मोठे बंधारे बांधले व त्यांना पायऱ्या बांधून रस्ता केला व पर्यटकांच्या पार्कींगची सोया केली तर मुरुडला येणार पर्यटक उधाणलेल्या समुद्रात जायला घाबरतो त्यावेळी गारंबीचा संथ पाण्यात भिजण्याचा सुरक्षित आनंद घेणे पसंत करेल .नागशेत गावात ,शिंगरे गावात ,तळवडे गावातून धरणाचे पाणी समुद्राला मिळते या ठिकाणी पर्यटन बंधारे होणे गरजेचे आहे.

> **गारंबी धरणाचा पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने मूळ धरणाला हात लावणे तांत्रिक दृष्ट्या शक्य नसल्याने धरणातून फुकट जाणारे पाणी धरणाखाली नागशेत गावाजवळची दरीतून वाहत येते २ डोंगर जर उंच बंधारा बांधून भुशी डॅम प्रमाणे पायऱ्या केल्या तर पर्यटन व्यसायाला चालना मिळेल गारंबी मुरुड रस्त्याला लागत असल्याने पर्यटकाना जाणे सोपे होईल .**
>
> **–प्रमोद भायदे ( माजी पाणीपुरोवठा सभापती )**

## रोहा अष्टमी नगर परिषद नगर पथविक्रेता समितीची निवडणूक बिनविरोध

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद नगर पथविक्रेता समितीची निवडणूक बिनविरोध झाली आहे. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत केंद्र शासनाकडील पथ विक्रेता नियम २०१६ मध्ये नमूद नगर पथविक्रेता समितीचे रचनेनुसार रोहा नगर परिषदे मार्फत मुख्याधिकारी अजय एडके यांचे अध्यक्षतेखाली नगर पथविक्रेता समिती स्थापन करणेत आली.

या समिती मधील पथविक्रेते सभासदांचे आठ जागांकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकारी संस्था रोहा सहाय्यक निबंधक श्रीमती राखी गावडे यांनी दिनांक ०२डिसेंबर रोजी घेतलेली निवडणूक बिनविरोध झाली आहे.

निवडून आलेल्या बिनविरोध उमेदवारांमध्ये सर्वसाधारण गट कैलास दत्तात्रेय जाधव, सर्वसाधारण गट शैलेश परशुराम पवार, सर्वसाधारण गट (महिला राखीव) संगिता आबा जाधव, अनुसुचित जाती (महिला राखीव) हे पद रिक्त राहिले आहे. अनुसुचित जमाती मंगल महेश पवार, इतर मागास वर्ग रुपेश नारायण धाटावकर, अल्पसंख्यांक (महिला राखीव) रुबिना जुल्फीकार करबेलकर, विकलांग व्यक्ती प्रवर्गातुन निवृत्ती हरिश्चंद्र सुर्वे हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

# एमएनएम विद्यालयात क्रीडा महोत्सव

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या भव्य प्रांगणामध्ये आंतरशालेय क्रिडा महोत्सवास प्रारंभ झाला.

या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे शानदार उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या शानदार उद्घाटन सोहळ्यास गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, प्रकाश भगत, न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच विजेंद्र पाटील, किशोर पाटील, विश्वनाथ कोळी, राधाताई ठाकूर, श्रीकांत घरत, जयवंत देशमुख, मिनाक्षी पाटील, तसेच विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांचेसह येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या चश्मिंदर बक्शी, विधिज्ञ रूपेश म्हात्रे, समिक्षा भोईर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, डी. के. म्हात्रे, मढवी सर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी शानदार क्रीडा प्रकारांचे प्रदर्शन केले. उलवे येथील वॉरिअर्स क्लबचे प्रशिक्षणार्थी असलेल्या व ह्या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या मातीतला पारंपारिक खेळ 'लाठी-काठी' ह्या खेळाचे अत्यंत प्रेक्षणीय प्रदर्शन केले. या वेळी उद्घाटक आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनावेळी सर्व विद्यार्थ्यांना आणि खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# 'सीकेटी'त वार्षिक क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) शनिवारी (दि.१४) संकुलात वार्षिक क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष सुधीर ठाकूर आणि सह सचिव श्रावणी वरेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी केले. या वेळी क्रिडा संकुलातील राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्या क्रिडा पटुंचे अभिनंदन त्यांनी केले तसेच खेडाळूंना शुभेच्छा दिल्या.

या कार्यकमाचे क्रिडा ध्वजाचे ध्वजारोहन सुधीर ठाकूर यांनी केले. श्रावणी वरेकर यांच्या हस्ते क्रिडा ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. सुधीर ठाकूर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत खेळाचे महत्त्व सांगितले. सर्व खेळाडूंना शुभेच्छा देत सर्व खेळांमध्ये सहभागी व्हा, असे सांगितले.

सीकेटी इंग्रजी माध्यमाच्या चारही कुल व एनसीसीचे विद्यार्थी शिस्तबद्ध संचलन करून पाहुण्यांना मानवंदना दिली. या उद्घाटनावेळी १०० मी. धावण्याची स्पर्धा मुले आणि मुली या दोन्ही गटात घेण्यात आली. या वेळी सीकेटी संकुलातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. या कार्यकार्माचे सूत्रसंचालन सहशिक्षिका पूर्वा खेडेकर यांनी करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी सर्व उपस्थितीतांचे आभार मानले.








# राज्य निवडक चाचणी तिरंदाजी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्यातर्फे फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ रायगड यांच्या यजमानपदाखली आयोजित करण्यात आलेल्या १४व्या महाराष्ट्र राज्य फिल्ड इनडोअर तिरंदाजी निवड चाचणी स्पर्धाला प्रारंभ झाला.

जिल्हा क्रीडा संकुल नेहुली, अलिबाग ही स्पर्श खेळली जात आहे. शनिवारी (दि. १४) रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेमदर अतनूर, फिल्ड आर्चरी ओसोसिएशन महाराष्ट्राचे महासचिव सुभाषचंद्र नाय, फिल्ड आर्चरी ओसोसिएशन महाराष्ट्र उपाध्यक्ष रितिका नायर, वेश्वी ग्राम पंचायतीचे सरपंच गणेश गावडे, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ रायगडचे सचिव संतोष जाधव, मिलिंद पांचाळ , वैभव सागवेकर, अजिंक्य अडकर, लाभेश तेली आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

या स्पर्धेतून महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार आहे. या संघ उत्तर प्रदेशातील लखनौ येथे होणाऱ्या राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत सहभागी होणार आहे.

# फुंडे हायस्कूल येथे वार्षिक क्रीडा महोत्सव जल्लोषात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय येथे १० व ११ या दोन दिवसांमध्ये क्रीडा महोत्सव जल्लोषात झाला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे व चेअरमन कृष्णाजी कडू यांच्या हस्ते करण्यात आले. वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे आयोजन या क्रीडा महोत्सवात करण्यात आले होते. क्रीडा विभाग प्रमुख दिगंबर पाटील यांनी या महोत्सवाचे अत्यंत सुंदर असे नियोजन केले होते.

वैयक्तिक स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी व सहावीसाठी मनोरंजनात्मक खेळ यामध्ये चमचा गोटी, फुगे फोडणे असे खेळ घेण्यात आले; तर पाचवी ते दहावी सर्व विद्यार्थ्यांसाठी रिले, धावणे, थाळीफेक, गोळाफेक या स्पर्धा घेण्यात आल्या व सांघिक स्पर्धेत कबड्डी व खो-खो अशा स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यालयातील पाचवी ते दहावी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांनी या क्रीडा स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या वतीने विजयी आणि सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले. सर्व स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या वेळी बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव केला जाणार आहे.

# वाशीच्या मॉडर्न स्कूलमध्ये क्रीडा महोत्सवाची सांगता



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कुलचा, ४५व्या क्रीडा महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.१४) झाला. ९ डिसेंबरपासून सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवाची सांगता शनिवारी झाली.

या वेळी आंतरराष्ट्रीय नेमबाजी खेळाडू नमिता पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना मुलांवर लहानपणापासूनच अभ्यासाप्रमाणे खेळाचे संस्कारही करा, असे आवाहन केले.

विद्यालयाच्या आवारात पार पडलेल्या या महोत्सवास नमिता पाटील (आंतर राष्ट्रीय नेमबाजी खेळाडू), यश म्हात्रे (बांधकाम व्यवसायिक, डोंबिवली), गणेश पाटील (संस्थापक अध्यक्ष, नवी मुंबई वेल्फेअर फाउंडेशन), संगीता मोहोकर (माझी विद्यार्थिनी), सुमित्र भोसले (प्राचार्या मॉडर्न स्कूल), रवींद्र वाघ (मुख्याध्यापक मराठी प्रथमिक), विद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थी, पालक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंना गौरविण्यात आले.

# 'आई डे केअर'तर्फे संयुक्त क्रीडा स्पर्धा



**पेण : प्रतिनिधी**

आई डे केअर संस्था संचालित दिव्यांग (गतिमंद) मुलांसाठी निवासी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्र रामवाडी पेण येथील मुलांच्या क्रीडा स्पर्धा नगरपालिकेच्या मैदानावर घेण्यात आल्या. स्पर्धेत पेण नगरपालिका शाळा क्र.९ मराठी शाळेतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांनीसुद्धा सहभाग घेतला.

प्रारंभी दीप प्रज्वलन प्रशासन अधिकारी संगीता माने, शिक्षक दशरथ एरंणकर, रूपेश पाटील, महेंद्र मोहिते, आलोक कुमार, रसिक काळे, जयेश शहा, विद्यार्थिनी पूर्वा दपके, विद्यार्थी सुमित यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत संस्थापिका स्वाती मोहिते यांनी केले.

विविध खेळांमध्ये मुलांनी सहभाग घेतला १०० मीटर धावणे, ५० मीटर चालणे, गोळा फेक, लांब उडी, चमचा लिंबू असे खेळ रंगले. जे विद्यार्थी विजयी झाले त्यांचा गुणगौरव करण्यात आला. उपस्थितांचे आभार संस्थेच्या अध्यक्ष व मुख्याध्यापिका प्रेमलता पाटील यांनी मानले.





वर्ष ४१ वे ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ स्थापना १९८३

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोर्दशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह
श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरिमल्लेश्वर महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥ श्री. स.स. प्रेमचैतन्य महाराज की जय ॥
गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥




अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४६, शुक्रवार दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४६, रविवार दि. १५/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रीची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपारची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

रविवार दिनांक 15/12/2024

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० संगीत भजन | नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा - ओवेपेठ), देवसागर साधक समाज सामुदाईक संगित भजन<br>बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर). |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

व्यवस्थापक : देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)

संयोजक: श्री. रामशेठ ठाकूर (मा. खासदार, रायगड), व परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

कार्यक्रमाचे स्थळ : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो.गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल । कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिला जाईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com